दैनिक
https://samarthrajyog.com/
E-Mail : dainiksamarthrajyogbeed@gmail.com
# समर्थ राजयोग
SAMARTH RAJYOG
वैभव विवेक स्वामी
संपादक
राजमान्य, राजशक्ती
No.LSB / Beed / RNP - 200 / 2024 - 2026.



स्कॉर्पिओचा फॉरेन्सिक अहवाल प्राप्त, काचेवरील ठसे आरोपी सांगळेचे

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी | वर्ष - ५ वे अंक -२०३ शुक्रवार, दि.२८ मार्च २०२५ | 98 22 62 85 21 | आरएनआय -एमएएचएमएआर/२०२०/७९८०१ | किंमत ३ रु | पाने ४
Beed Daily Marathi | Year-5th | Issue-203 | Friday, Dt.28 March 2025 | 98 22 62 85 21 | RNI - MAHMAR/2020/79801 | Price 3 Rs. | Pages 4

## आरोपींच्या स्कॉर्पिओ कारमध्ये सापडले १९ पुरावे

# तिघांनी दिली खुनाची कबुली

बीड - सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्याप्रकरणात जप्त करण्यात आलेल्या काळ्यास्कॉर्पिओत एकूण १९ पुरावे सीआयडीलाआढळले आहेत. कारचा फॉरेन्सिकतपासणी अहवाल आला असून डाव्यादरवाजाच्या काचेवरील दोन ठसे आरोपीसुधीर सांगळेचे असल्याचे समोर आलेआहे. या गुन्ह्यातील आरोपी जयराम चाटे, महेश केदार आणि सुदर्शन घुले या तिघांनी पुण्याच्या मॅजिस्ट्रेटसमोर कबुली जबाबदिला होता. त्यांच्या कबुलीजबाबाची प्रत आरोपीच्या वकिलांना दिली आहे.

या प्रकरणात पोलिसांनी जप्त केलेल्याएमएच ४४ झेड ९३३३ या क्रमांकाच्याकाळ्या रंगाच्या स्कॉर्पिओची फॉरेन्सिक तपासणी करण्यात आली. डाव्या बाजूच्या काचेवर दोन ठसे आढळले. ते आरोपीसुधीर सांगळे याचे असल्याचे समोर आले.

आंधळेला अटक करा, सर्वआरोपींना फाशी द्या- देशमुख

चार महिन्यांनंतर संतोष देशमुख यांच्याहत्येची आरोपींनी कबुली दिली आहे.आरोपी कृष्णा आंधळे याला अटक करातसेच सर्व आरोपींना फाशीची शिक्षाद्यावी, अशी मागणी धनंजय देशमुखयांनी केली आहे.

मॅजिस्ट्रेटसमोर कबुलीमुळेकेस संपल्यात जमा- दमानियासुदर्शन घुलेने देशमुख हत्याप्रकरणी पोलिसांपुढे कबुली दिली असेलतर ग्राह्य धरली जात नाही. मॅजिस्ट्रेटपुढेदिली तर केस संपल्यात जमा आहे.कलम १६४ नुसार जर कबुली दिलीअसेल तर चांगलेच आहे, अशीप्रतिक्रिया सामाजिक कार्यकर्त्या अंजलीदमानिया यांनी व्यक्त केली. त्या म्हणाल्याकी, बालाजी तांदळे, शिवलिंग मोराळ,राजेश पाटील, प्रशांत महाजन हे पोलिसअधिकारीदेखील आरोपींच्या संपर्कातहोते. या सर्वांना सहआरोपी करावे. तेधनंजय मुंडे यांना छुपी मदत करत होते.हत्येचा सूत्रधार वाल्मीक कराड होताअसे चार्जशीटमध्ये येत नाही तो पर्यंतत्यांना फाशीची शिक्षा होणार नाही, असेदमानिया यांनी सांगितले.

देशमुखांना २ तास मारहाण

घटनेच्या दिवशी ९ डिसेंबरला ३ वाजून४६ मिनिटांनी आरोपींनी मारहाणकरायला सुरुवात केली होती, तरशेवटचा व्हिडिओ हा ५ वाजून ५३मिनिटांचा आहे. त्यानंतर काही वेळानेदेशमुख यांचा मृत्यू झाला. आरोपींनीदेशमुखांना २ तास ७ मिनिटे म्हणजे १२७मिनिटे मारहाण केल्याचे स्पष्ट होते.

मॅजिस्ट्रेटसमोर कबूलनामा

आरोपी जयराम चाटे, महेश केदार आणिसुदर्शन घुले यांना पुण्यात अटक केलीहोती. सीआयडीने सेक्शन १८ प्रमाणेतिघांना पुण्याच्या मॅजिस्ट्रेटसमोर हजरकरून कबुलीजबाब घेतले होते. हे जबाबबंद पाकिटातून विशेष सरकारी वकिलांनापाठवण्यात आले होते. त्यांची प्रतआरोपींच्या वकिलांना दिली आहे.

## तालुक्यातील मच्छिंद्रनाथ गड ते कानिफनाथ गड होणार रोपवे, कॅबिनेटमध्ये मंजुरी

आष्टी ( प्रतिनिधी)

भारतातील मच्छिंद्रनाथनाथाची एकमेव संजीवनी समाधी असलेल्या देवस्थानावर दिवसेंदिवस भाविकांची गर्दी वाढत असताना येथील नाथ भक्तांना अधिकाधिक सेवा देण्यासाठी मच्छिंद्रनाथ देवस्थानचे विश्वस्त तथा आमदार सुरेश धस यांनी शासन दरबारी पाठपुरावठा करत कॅबिनेट मध्ये स्वत:राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आष्टी तालुक्यातील सावरगांव मायंबा ते पाथर्डी तालुक्यातील असलेल्या कानिफनाथ देवस्थान या ३.६ कि. मी. अंतरावर रोपवे ची मान्यता दिली असून,या सुविधेमुळे नाथभक्तांच्या वतीने आमदार सुरेश धस यांनी मुख्यमंत्री व राज्यशासनाचे आभार मानले आहेत.



राज्याच्या शासनाच्या पर्यटक विभागाने राज्यात

छक्डचड कंपनी मार्फत नविन २९ पर्यटन ठिकाणी रोपवे सुरु करण्याचा करार केला असून, यामध्ये ३.६ कि. मी. साठी आष्टी तालुक्यातील मायंबा मच्छिंद्रनाथ गड ते पाथर्डी तालुक्यातील मढी येथील कानिफनाथ देवस्थानचा समावेश करण्यात आला असल्याने नाथभक्तांची सोय होणार आहे. यामुळे रोपवे मुळे नाथभक्तांना या स्थळांपर्यंत पोहोचणे अधिक सुलभ होणार असून, स्थानिक अर्थव्यवस्थेलाही चालना मिळणार आहे.

शब्दांचे पक्के...देवेंद्र बाहुबली..!

दि. ५ फेब्रुवारी रोजी राज्याचे कर्तव्यदक्ष मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस साहेब हे श्रीक्षेत्र मच्छिंद्रनाथ गड येथे संजीवन समाधी मंदिर भूमीपर्यंत सोहळ्यास उपस्थित होते त्यावेळी श्री क्षेत्र मच्छिंद्रनाथ गड देवस्थान ट्रस्ट व श्री क्षेत्र कानिफनाथ देवस्थान ट्रस्ट मढी यांनी श्री. क्षेत्र मढी ते श्री. क्षेत्र मच्छिंद्रनाथ गड (मायंबा) ते क्षेत्र कानिफनाथ गड मढी (मायंबा) रोप - वे यास मा. मुख्यमंत्री श्री. देवेंद्रजी फडणवीस साहेब व केंद्रीय मंत्री श्री. नितीनजी गडकरी साहेब यांच्या सहकार्याने त्या कामास शासनाची मान्यता मिळाली असल्याने आष्टी तालुक्यातील क्षेत्र मच्छिंद्रनाथ संजीवन समाधी व लगतच पाथर्डी तालुक्यात असणारे श्रीक्षेत्र कानिफनाथ संजीवन समाधी हे पाथर्डी तालुक्यातील श्रीक्षेत्र हे लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असून या ठिकाणी श्री मच्छिंद्रनाथ व कानिफनाथ यांच्या दर्शनासाठी लाखो भाविक राज्याच्या कानाकोपऱ्यातून येतात. सदरील रोप - वे मुळे येथील स्थानिक पर्यटनास चालना मिळणार असून त्या माध्यमातून रोजगार निर्मिती होईल. भाजपा महायुती सरकारच्या माध्यमातून मतदारसंघात विकासाची गंगा आणण्यास आम्ही कटिबद्ध आहोत. शासनाच्या राष्ट्रीय रोप - वे कार्यक्रम - पर्वतमाला अंतर्गत श्री क्षेत्र सावरगांव (श्री मच्छिंद्रनाथ गड) ते श्री क्षेत्र मढी (चैतन्य

(उर्वरीत पान २ वर)

## तहसील कार्यालयात केवायसी साठी आलेल्या संजयगांधी लाभार्थी महिलेचा चक्कर येऊन मृत्यू

### आईच्या मृत्यूला तहसीलदार व कार्यालय कर्मचारी जबाबदार मुलाची तक्रार

प्रतिनिधी । धारूर

तहसील कार्यालयामध्ये संजय गांधी योजनेअंतर्गत लाभ मिळण्यासाठी केवायसी करण्यासाठी आलेल्या लाभार्थी वृद्ध महिलेचा चक्कर येऊन मृत्यू झाल्याची घटना गुरुवारी सकाळी अकरा वाजण्याच्या सुमारास घडली .तहसील कार्यालयाच्या तळमजल्यातील कोंडवाड्यात केवायसी करण्यात येत होती .यावेळी २०० च्या जवळपास लाभार्थ्यांची गर्दी झाली होती .गर्दीमध्ये गुदमरून महिलेचा मृत्यू झाला .कमलबाई बाबुराव कसबे वय ७० वर्षे असे मयत महिलेचे नाव आहे .या संदर्भात आईच्या मृत्यूला तहसीलदार व कर्मचारी जबाबदार असल्याचे निवेदनही मयताचा मुलगा सुभाष कसबे दिले आहे .



तालुक्यातील जहागीरमोहा येथील कमलबाई बाबुराव कसबे या संजय गांधी योजनेतील लाभार्थी आहेत .शासनाच्या नियमानुसार महाडीबीटीवर लाभ मिळण्यासाठीपैसे केवायसी करणे बंधन करण्यात आले आहे .या केवायसी साठी मागील दोन ते तीन महिन्यापासून लाभार्थी तहसील कार्यालयात चकरा मारत आहेत .लाभार्थ्यांचे केवायसी करण्याचे काम तहसील कार्यालयाच्या तळमजल्यात ठेवण्यात आले आहे .हा तळमजला कमी उंचीचा असून येथे कसल्याही प्रकारची हवा मिळत नाही .येथे फॅन्सी ही व्यवस्था करण्यात आलेली नाही .या मजल्यासाठी तीन दरवाजे व काही खिडक्या आहेत .त्या नेहमीच बंद असतात . येथे फॅन ची सुविधा नसल्यामुळे ऐन उन्हाळ्याच्या दिवसात येथे उष्माघाताचा प्रकार होऊ शकतो .गुरुवारी सकाळी कमलाबाई कसबे या बसने धारूर येथे आल्या होत्या .बस स्थानकापासून चालत तहसील कार्यालयात सकाळी ११ वाजता पोहोचल्या .यावेळी येथे तळमजल्याचा दरवाजा उघडण्यासाठी कर्मचारी जयस खरात नावाचे कर्मचारी आले .दरवाजा उघडल्यानंतर इथे २०० च्या जवळपास लाभार्थ्यांची तुंबळ गर्दी झाली .या गर्दीमध्ये कमलबाई कसबे सापडल्या .गर्दीमध्ये उष्माघात झाल्यामुळे त्यांना चक्कर

(उर्वरीत पान २ वर)

## शुक्रवारी बीड येथे विश्वस्थांची कार्यशाळा – धर्मदाय उपायुक्त प्रदिप चौधरी

बीड ।प्रतिनिधी

महाराष्ट्र शासनाने बीड जिल्ह्यातील विश्वस्तांसाठी १०० दिवसाच्या कृती आराखड्या अंतर्गत व मा.मुख्यमंत्री यांच्या संकल्पनेतून विश्वस्तांसाठी कायद्याचे ज्ञान तसेच न्यास व संस्थेचे कार्य व व्यवस्थापक कायद्यानुसार होण्यासाठी तसेच न्यासाचे कार्य व विश्वस्ताचे उत्तर दायकत्वाची माहिती व सार्वजनिक विश्वस्त व्यवस्थेमधील कायद्याची माहिती देण्यासाठी विश्वस्त कार्यशाळा सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, बीड व बीड जिल्हा धर्मादाय वकिल संघ बीड यांच्या संयुक्त विद्यमाने सोनाजीराव क्षीरसागर होमिओपॅथिक मेडिकल कॉलेज बीड नवगण कॉलेज रोड बीड येथे दि.२८ मार्च रोजी सकाळी १०.३० ते दुपारी २ वाजेपर्यंत आयोजित केले आहे. या विश्वस्त कार्यशाळेच्या कार्यक्रमाचे अधयक्ष म्हणून धर्मादाय उपायुक्त बीड प्रदिप चौधरी यांची उपस्थिती लाभणार आहे.

या प्रसंगी विशेष उपस्थिती म्हणून माजी मंत्री जयदत्त अण्णा क्षीरसागर,तसेच कार्यक्रमाचे मुख्य निमंत्रक सहाय्यक धर्मादाय आयुक्त सुधीर कांबळे, बीड जिल्हा धर्मादाय वकील संघाचे अध्यक्ष ॲड. उदयसिंह सालपे, या विश्वस्त कार्यशाळेचे निमंत्रक म्हणून उपस्थित राहतील. या सर्वांच्या उपस्थितीत विश्वस्तांना विश्वस्त कार्यशाळेव्दारे संस्थेच्या व न्यासाच्या पदाधिकार्यासह विश्वस्तांना अमुल्य मार्गदर्शन देण्यासाठी या विश्वस्त कार्यशाळेचे प्रमुख मार्गदर्शक म्हणून धर्मादाय सह आयुक्त लातूर राजेश ससाणे यांच्या उपस्थितीत जिल्ह्याच्या विश्वस्तांना मार्गदर्शन लाभणार आहे. या कार्यशाळेचा जिल्ह्यातील सर्व विश्वस्तांनी लाभ घ्यावा असे आवाहन सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, बीड व बीड जिल्हा धर्मादाय वकिल संघ बीड यांच्या वतीने करण्यात आले आहे.

या बैठकीस धर्मादाय उपयआयुक्त बीड प्रदिप चौधरी, सहाय्यक धर्मादाय आयुक्त बीड सुधीर कांबळे व कार्यालयीन कर्मचारी वृंद तसेच बीड जिल्हा धर्मादाय वकिल

(उर्वरीत पान २ वर)

## श्री क्षेत्र मच्छिंद्रनाथ गड ते कानिफनाथ गड रोप-वे ला शासनाची मंजुरी

### ना.पंकजाताई मुंडे यांनी मानले केंद्र व राज्य सरकारचे आभार

बीड ।प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील श्री क्षेत्र मच्छिंद्रनाथगड (मायंबा) ते पाथर्डी तालुक्यातील श्री क्षेत्र कानिफनाथगड (मढी) या दरम्यान ३.६ कि.मीच्या रोप-वे प्रकल्पाला राज्य सरकारने मान्यता देवून नाथ भक्तांना सुविधा उपलब्ध करुन दिल्याबद्दल राज्याच्या पर्यावरण,वातावरणीय बदल व पशूसंवर्धन मंत्री ना.पंकजाताई मुंडे यांनी राज्य व केंद्र सरकारचे आभार मानले आहेत.

या दोन्ही गडा दरम्यान रोप-वे सुरू करावा यासाठी पाथर्डीचे आमदार मोनिका राजळे यांनी वेळोवेळी पाठपुरावा व प्रयत्न केला होता, त्यांच्या पाठपुराव्या नंतर राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या सहकार्याने शासनाच्या राष्ट्रीय रोप-वे कार्यक्रम पर्वतमाला या अंतर्गत मायंबा ते मढी या ३.६ किमीच्या हवाई अंतरामध्ये सदर रोप-वे सुरू करण्यास शासनाने मान्यता दिली आहे.

या प्रकल्पामुळे बीड-नगर जिल्ह्याच्या पर्यटन विकासाला नवी दिशा मिळणार असुन ऐतिहासिक आणि धार्मिक स्थळांना भेट देणाऱ्या पर्यटकांची संख्या यामुळे वाढणार आहे. ग्रामीण भागातील लोकांना रोजगाराच्या नवीन संधी देखील यामुळे उपलब्ध होतील. राज्य सरकारच्या या निर्णयामुळे दोन्ही जिल्ह्यातील पर्यटन आणि दळणवळण क्षेत्राला चांगला फायदा होणार आहे. दरम्यान, हा रोप-वे सुरू करुन नाथ भक्तांना सुविधा उपलब्ध करुन दिल्याबद्दल ना. पंकजाताई मुंडे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचे आभार मानले आहेत.

## आ.संदीप क्षीरसागर महाराष्ट्र विधीमंडळ समितीवर

### पंचायतराज समितीवर झाली निवड

मुंबई ।प्रतिनिधी

बीड विधानसभा मतदारसंघाचे आमदार संदीप क्षीरसागर यांची महाराष्ट्र विधीमंडळाच्या पंचायतराज या महत्त्वपूर्ण समितीवर निवड झाली आहे. गुरूवारी (दि.२७) रोजी विधीमंडळ सचिवालयाकडून ही निवड जाहीर करण्यात आली असून, त्यांच्या या नव्या जबाबदारीबद्दल राजकीय वर्तुळातून कौतुक होत आहे.

आ. संदीप क्षीरसागर हे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार असून, बीड जिल्ह्यातील जनतेच्या प्रश्नांना विधानसभेत प्रभावीपणे वाचा फोडण्यासाठी ते ओळखले जातात. आमदार होण्याअगोदर आ.संदीप क्षीरसागर यांनी पाच वर्षे पंचायत समिती सभापती, अडीच वर्षे जिल्हा परिषद सदस्य व पाच वर्षे जिल्हा परिषद सभापती असे एकूण साडेबारा वर्षे पंचायत राज व्यवस्थेमध्ये प्रत्यक्ष काम केले आहे. त्यामुळे पंचायत राज व्यवस्थेचा त्यांना सखोल अभ्यास आहे. आता पंयायतराज समितीवर त्यांची निवड झाल्याने त्यांना विधीमंडळाच्या कामकाजातही अधिक सक्रिय सहभाग घेता येणार आहे. ही समिती राज्यातील पंचायत राज विभागाच्या महत्त्वाच्या धोरणांवर देखरेख ठेवून सरकारला शिफारशी



(उर्वरीत पान २ वर)

### ही माझ्यासाठी मोठी जबाबदारी– आ.संदीप क्षीरसागर

विधीमंडळाच्या पंचायत राज समितीमध्ये निवड ही माझ्यासाठी मोठी जबाबदारी आहे. मी माझ्या मतदारसंघातील आणि महाराष्ट्राच्या ग्रामीण भागातील जनतेच्या हितासाठी पंचायत राज समितीच्या माध्यमातून काम करेन. बीड जिल्ह्याच्या विकासाला गती देण्यासाठी आणि जनतेच्या समस्या सोडवण्यासाठी मी कटिबद्ध आहे. असे, निवडीबद्दल प्रतिक्रिया देताना आ. क्षीरसागर यांनी म्हटले.

## बार्शी नाका परिसरात दोन गटांमध्ये तुफान हाणामारी

### भांडणात तिघेजण गंभीर जखमी

बीड ।प्रतिनिधी

बीड शहरातील बार्शी नाका परिसरात हिना पेट्रोल पंप समोरील भागात शुल्लक कारणावरून वाद झाला.या वादातून दोन गटांमध्ये तुफान हाणामारी झाली. या भांडणात धारदार शस्त्रांचा वापर करण्यात आला असून, यामध्ये तिघेजण गंभीर जखमी झाले आहेत. त्यांच्यावर सध्या जिल्हा रुग्णालयात उपचार सुरू आहेत. यापैकी एकाची प्रकृती चिंताजनक असून त्यांना संभाजीनगर येथे पुढील उपचारासाठी पाठवण्यात आले.



या वादाची सुरुवात लहान मुलांच्या भांडणातून शुल्लक कारणावरून झाले. कालचा झालेला वाद आज मिटवण्यासाठी दोन्ही गट दुपारी समोरासमोर बसले. मात्र, वाद मिटण्याऐवजी तो अधिक चिघळला आणि अखेर हाणामारीत परिवर्तित झाला.एका गटाने दुसऱ्या घरावर हल्ला चढवला या हल्ल्यात कोयता, तलवार धारदार शस्त्रांचा वापर करूत हल्ला करण्यात आल्याची सांगण्यात येत असून. यामध्ये १) मोमीन अन्सार अब्दुल सत्तार,२)मोमीन मुजाहिद अब्दुल सत्तार ३) मोमीन शहबाज मोमीन हे तिघे गंभीर जखमी झाले आहेत. हे सर्वजण बार्शी नाका, हिना पेट्रोल पंप परिसरातील रहिवासी आहेत.यातील एकाची प्रकृती चिंताजनपसून पुढील उपचारासाठी. संभाजीनगर येथे हलवण्यात आले.या घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी प्रयत्न सुरू असून, या हाणामारीत सहभागी असलेल्या आरोपींचा शोध घेतला जात आहे. पुढील तपास पोलीस करत आहेत. या हल्ल्याची माहिती मिळताच बीड शासकीय रुग्णालयामध्ये जखमी ना पाहण्यासाठी गर्दी झाली होती.

शुद्ध सोने ! अप्रतिम कलाकुसर !! विश्वासाची परंपरा !!!
प्रमाणित सुवर्ण अलंकाराचे AC दालन
दहिवाळ सुवर्णकार
नवीन पत्ता : डी.पी.रोड, सहयोगनगर, सारडा नगरी जवळ, बीड
☎: 0230377, मो. 8432771777
शाखा : माळीवेस, बीड
☎: 0220377, मो. 9405072777

दैनिक समर्थ राजयोग
SAMARTH RAJYOG



## संपादकीय

# निव्वळ काथ्याकूट

एकहाती सत्ता मिळाल्याने खरे तर सरकारकडे इतकी जबरदस्त ताकद आहे, की कोणतेही निर्णय ते धडाडीने घेऊ शकतात; पण राणा भीमदेवी थाटात कितीही घोषणा केल्या तरी राज्याची आर्थिक परिस्थिती कशी आहे, ते अर्थसंकल्पातून समोर आलेलेच आहे.

अखेर विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाचे सूप वाजले. या अधिवेशनात मांडण्यात आलेल्या अर्थसंकल्पातून जनतेच्या हाती काहीच लागले नाही, अगदी तीच गत संपूर्ण अधिवेशनाची होती. एकहाती सत्ता मिळाल्याने खरे तर सरकारकडे इतकी जबरदस्त ताकद आहे, की कोणतेही निर्णय ते धडाडीने घेऊ शकतात; पण राणा भीमदेवी थाटात कितीही घोषणा केल्या तरी राज्याची आर्थिक परिस्थिती कशी आहे, ते अर्थसंकल्पातून समोर आलेलेच आहे. त्यामुळे कुठल्याही नव्या योजनांची घोषणा झाली नाही.

विरोधकांकडे संख्येचे बळ नाहीच, पण जनतेने सरकारवर अंकुश ठेवण्याच्या दिलेल्या जबाबदारीचे यत्किंचितही भान नाही. त्यामुळे शेतमालाच्या भावापासून ते मुंबई-पुणे, नागपूर-नाशिक आदी शहरांमधील समस्यांपर्यंत आणि विजेपासून ते सिंचनापर्यंत कुठल्याच प्रश्नावर गांभीर्याने विशेष चर्चाच झाल्या नाहीत. वाहिन्यांवर चमकण्यासाठी मुख्य प्रवेशद्वाराच्या पायऱ्यांवर बॅनरबाजी करणे, चित्रविचित्र कपड्यांसह कॅमेऱ्यांचे लक्ष वेधून घेणे, भावनिक विषयांवरून एकमेकांवर कुरघोडी करणे आदी सत्ताधारी व विरोधकांचे सातत्यपूर्ण कंटाळवाणे प्रयत्न यालाच फलित मानायचे असेल तरच या अधिवेशनातून जनतेचे प्रश्न मार्गी लागले, असे म्हणता येईल. गृह खात्याच्या विषयासह असंख्य मुद्दे असतानाही विरोधकांची अवस्था हवा गेलेल्या फुग्यासारखीच पिचपिचीत झाली होती.

**दिवाणी न्यायालय, घनसावंगी येथील**
**श्रीमती एल. एन. पांचाल सह दिवाणी न्यायाधीश व प्र.वर्ग न्यायदंडाधिकारी घनसावंगी यांचे न्यायालयात.**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्रं. ५६/२०२५**
**अफसरबी - वि. - निरंक**
**नि.क. ५**

अर्जदार : १. अफसरबी हामीद शेख, वय ६५ वर्षे, धंदा घरकाम,
२. जावेद हामीद शेख, वय ४० वर्षे, धंदा शेती,
३. असलम हामीद शेख, वय ३८ वर्षे, धंदा झेरॉक्स दुकान,
४. नसीम हमीद शेख, वय ३६ वर्षे, धंदा शेती,
५. हारुन हामीद शेख, वय २८ वर्षे, धंदा शेती,
६. नुजहत हामीद शेख, वय २६ वर्षे, धंदा घरकाम,
सर्व रा. पिरगैबवाडी, ता. घनसावंगी, जि. जालना.
विरुद
गैरअर्जदारः निरंक
जाहीर प्रगटन

कलम ३, व ७ बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट प्रमाणे वारसा प्रमाणपत्र मिळणेबाबत.

अर्जदार यांनी ॲड. टी. एस. गव्हाणे यांच्या मार्फत या न्यायालयात असा अर्ज केला की, अर्जदार यांचे वडील मयत नामे हामीद महेबुब शेख यांचे दिनांक ०४.१२.२०२३ रोजी मयत झालेले आहेत.

हे की, मयत मयत हामीद महेबुब शेख यांना अर्जदारांशिवाय ईतर अन्य कुठलेही कायदेशीर वारस नाहीत. अर्जदारास शासकीय व निमशासकीय कामकाजासाठी मयताचे वारस म्हणून वारस प्रमाणपत्राची नितांत आवश्यकता आहे.

करीता, या जाहीर प्रगटनाद्वारे सर्वत्र कळविण्यात येते की, या बाबत जर कोणास काहीएक आक्षेप असेल तर त्यांनी सदरचे प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात आपला आक्षेप सादर करावा. जर नमूद केलेल्या काळात कोणाचाही आक्षेप आला नाही, तर संबंधित प्रकरणात कायद्याप्रमाणे योग्य ती कार्यवाही केली जाईल, याची नोंद घ्यावी. सदर प्रकरणात पुढील तारीख २३.०४.२०२५ ठेवण्यात आली आहे.

आज दिनांक २६.०३.२०२५ रोजी माझ्या सहीनिशी व या न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले आहे

**स्वाक्षरित/-**
**कनिष्ठ लिपीक**

**स्वाक्षरित/-**
**आदेशावरून**
**सहाय्यक अधीक्षक**
**दिवाणी न्यायालय,**
**क.स्तर,घनसावंगी**

**जाहीर प्रगटन**
**मा. श्रीमती डी. के. पाटील साहेब ०६ वे सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, बीड यांच्या न्यायालयात**
किरकोळ दिवाणी अर्ज ५०२/२०२५
कल्पना विरुध्द निरंक
ॲड. काळे जी.व्ही.

अर्जदार :- १) कल्पना भ्र. सुदाम वाघमारे वय: ४२ वर्षे, धंदा घरकाम
२) सुदाम पि. एकनाथ वाघमारे वय: २४ वर्षे, धंदा: शिक्षण
३) ओमकार पि.सुदाम वाघमारे वय: २२ वर्षे, धंदा शिक्षण
४ प्रियंका भ्र. मनोज वाळके वय २१ वर्षे धंदा घरकाम
५. भगिरथी भ्र. एकनाथ वाघमारे वय ७२ वर्षे धंदा घरकाम सर्व रा. चाकरवाडी ता.जि.बीड
विरुध्द निरंक

मागणी अर्ज :- बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ नुसार वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत...

वरील अर्जदार यांनी या न्यायालयात मयत नामे सुदाम पि. एकनाथ वाघमारे यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळवण्यासाठी अर्ज केला आहे.

ज्याअर्थी मयत नामे सुदाम पि. एकनाथ वाघमारे रा. चाकरवाडी ता.जि.बीड यांचा मृत्यु दिनांक : २१.०४.२०२४ रोजी शासकीय रूग्णालय, आष्टी ता. आष्टी.जि.बीड येथे अपघाती मृत्यु झाला. अर्जदार क्र १ ही मयताची पत्नी असून अर्जदार क २ व ३ ही मयताची मुले आहेत. अर्जदार क ४ ही मयताची विवाहीत मुलगी असून अर्जदार क ५ ही मयताची आई आहे. मयतास सदर अर्जदारांशिवाय इतर कुणीही वारस नाही.

वरील अर्जदारांना मयताचे मृत्युनंतर शासकीय व निमशासकीय कामाकरीता सदर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे असे अर्जदार यांनी अर्जात नमुद केलेले आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार व गैरअर्जदार सदरहु मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहिरनाम्यांचे तारखेपासुन एक महिन्याचे आत त्यांनी या कोर्टात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु कोर्ट सदरहु अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवुन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु मयत सुदाम पि. एकनाथ वाघमारे रा. चाकरवाडी ता.जि.बीड यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक २०/०३/२०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले. सदर प्रकरणाची पुढील तारीख दिनांक २९/०४/२०२५.

**स्वाक्षरित/-**
**कनिष्ठ लिपीक**

**स्वाक्षरित/-**
**आदेशावरून**
**अधीक्षक**
**दिवाणी न्यायालय, व.स्तर,बीड**

# मंत्री आदिती तटकरेंच्या रायगड जिल्ह्यात १५८४९ लाडक्या बहिणी अपात्र ?


रायगड ।प्रतिनिधी

महायुती सरकारनं मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना जुलै २०२४ पासून सुरु केली आहे. लाडकी बहीण योजनेतील लाभार्थी महिलांच्या अर्जांची पडताळणीची प्रक्रिया सुरु आहे. राज्य सरकारच्या महिला व बाल विकास विभागाकडून विविध विभागांच्या मदतीनं अर्जांची छाननी सुरु आहे. महिला व बाल विकास मंत्री अदिती तटकरे यांच्या रायगड जिल्ह्यातील अपात्र ठरलेल्या लाडक्या बहिणींची संख्या समोर आली आहे. जिल्ह्यातील १५ हजार महिला अपात्र ठरल्याची माहिती मिळाली आहे.

राज्यातील लाडक्या बहिणींना जुलै २०२४ ते मार्च २०२५ या कालावधीत ९ हप्त्यांची रक्कम मिळाली आहे. ही योजना महिला व बालविकास विभागातर्फे चालवली जाते. या योजनेतून महिलांना दरमहा १५०० रुपये दिले जातात. यासाठी काही निकष देखील लागू करण्यात आले आहेत. म्हणजेच शासकीय नोकरीत असणाऱ्या महिलांना या योजनेचा लाभ मिळत नाही. याशिवाय ज्या कुटुंबाचं उत्पन्न अडीच लाखांपेक्षा अधिक असेल त्या कुटुंबातील महिलांना देखील मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा लाभ घेता येत नाही.

रायगडमध्ये किती महिला अपात्र ठरल्या ?

राज्य सरकारनं मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना सुरु करता दोन शासन निर्णय जारी केले होते. त्या शासन निर्णयात ज्या अटी निश्चित करण्यात आलेल्या आहेत त्याची अंमलबजावणी करण्याचं काम सुरु आहे. त्या नियम आणि अटीत ज्या अर्जदार बसत नाहीत



त्यांची नावं वगळली जात आहेत. महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांच्या रायगड जिल्ह्यातच एकूण १५८४९ लाडक्या बहिणी अपात्र ठरल्या आहेत. अनेक महिलांचे कागदपत्रांच्या त्रुटीमुळे फॉर्म अपात्र झाले आहेत अशी माहिती जिल्हा माहिती कार्यालयातून देण्यात आली आहे. रायगड जिल्ह्यात मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेसाठी १ जुलै २०२४ ते १७ मार्च २०२५ या कालावधीत नारी शक्तीदुत ॲप आणि मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या वेब पोर्टलवरुन अर्ज भरण्यात आले. नारी शक्तीदुत ॲपवरुन ३४९९१९ अर्ज दाखल झाले त्यापैकी ३४८६१९ अर्ज मंजूर झाले. तर लाडकी बहीण योजनेच्या पोर्टलवरुन २७५७९१ अर्ज दाखल झाले त्यापैकी २५१७१३ अर्ज पात्र ठरले. तर, एकूण १५८४९ अर्ज अपात्र ठरल्यानं नामंजूर करण्यात आले.

लाडक्या बहिणींना आतापर्यंत किती पैसे मिळाले ?

राज्याच्या महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी एका मुलाखतीत दिलेल्या माहितीनुसार साधारण पणे २ कोटी ४५ लाख लाडक्या बहिणींना फेब्रुवारी महिन्याच्या लाभाची रक्कम मिळाली आहे. ऑक्टोबरच्या तुलनेत फेब्रुवारीतील महिलांची संख्या अधिक आहे. आतापर्यंत ९ हप्त्यांचे पैसे महिलांना मिळाले आहेत. म्हणजेच एकूण १३५०० रुपये पात्र महिलांच्या खात्यात जमा झाले आहेत.फेब्रुवारी आणि मार्च महिन्याची रक्कम काहीच दिवसांपूर्वी महिलांच्या खात्यात वर्ग करण्यात आली.

६१ लाडक्या बहिणीने स्वतःहून घेतली माघार

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा लाभ नको अशी भूमिका देखील काही महिलांनी घेतली आहे. त्यानुसार रायगड जिल्ह्यातील ६१ महिलांनी लाभात बसत नसल्याने स्वतःहून आपले अर्ज मागे घेतल्याची माहिती देण्यात आली आहे.

# २ एप्रिल रोजी पालकमंत्री अजितदादा पवार यांना काळे झेंडे दाखवणार ?

## १६०५ वर्ग खोल्यांच्या दुरूस्ती गरज तर ५९२ वर्गखोल्या धोकादायक - डॉ.गणेश ढवळे

बीड ।प्रतिनिधी

बीड जिल्ह्यात जिल्हा परिषदेच्या २४७६ शाळा आहेत. या शाळांमध्ये १०,४७९ वर्गखोल्या असून यातील ५९२ वर्गखोल्या आता धोकादायक असून या ठिकाणी अध्यापन करू नये असे शिक्षण विभागाने कळविलेले आहे. दरम्यान धोकादायक इमारतीतील विद्यार्थी मंदिर, ग्रामपंचायत आणि झाडांचा आसरा घेऊन ऊन पावसात बसत आहेत. या धोकादायक शाळांना कोणी इमारत देत का इमारत असे म्हणण्याची वेळ आलेली आहे. शिक्षण विभाग, आमदार, खासदार, शिक्षणमंत्री यांना गेल्या ३-४ वर्षांपासून निवेदने आणि आंदोलने करूनही शासन याकडे गांभीर्याने पहात नसल्याने दि.२ एप्रिल रोजी बीड मध्ये नियोजन बैठकीसाठी येणारे उपमुख्यमंत्री तथा वित्त व नियोजन मंत्री महाराष्ट्र राज्य तथा पालकमंत्री बीड अजितदादा पवार यांना काळे झेंडे दाखवून तिव्र नाराजी व्यक्त करणार असल्याचे सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी म्हटले आहे.

मागील वर्षी मिळालेला निधी

सन २०२३-२५ मध्ये जिल्हा वार्षिक योजना (डीपीडीसी ),पंधरावा वित्त आयोग, जिल्हा परिषद फंड, गौण खनिज योजना या योजनेअंतर्गत उपलब्ध निधीच्या मर्यादेत १३० शाळांमधील ३१५ वर्गखोल्या दुरुस्तीसाठी ८ कोटी २९ लाख रुपये दिलेले आहेत. धोकादायक असलेल्या वर्ग खोल्यांपैकी ७३ वर्ग खोल्यांच्या बांधकामाकरिता व पत्र्याच्या शेडमध्ये भरणाऱ्या २५ शाळांकरीता करता २५ वर्ग खोल्या बांधकामासाठी असे एकूण ९८ वर्गखोली बांधकामा करिता रुपये १२ कोटी ७५ लाख निधी मंजूर करण्यात आलेला आहे.




सद्यस्थितीत अनेक शाळांचे काम अद्याप सुरू झालेले नाही. कार्यारंभ आदेश होऊनही शाळांची कामे केली जात नाहीत. काही ठिकाणी दुरुस्ती ऐवजी नव्याच शाळा बांधाव्यात अशी मागणी ग्रामस्थ करत आहेत.

बीड जिल्ह्यातील तालुका निहाय धोकादायक वर्गखोल्यांची संख्या

बीड जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या धोकादायक वर्ग खोल्यांची संख्या तालुका निहाय खालील प्रमाणे आहे.आष्टी ११९, आंबेजोगाई ३०, बीड ३७, धारूर ३०, केज २२, गेवराई १२५, माजलगाव २६, परळी ८८, पाटोदा ४०, शिरूर ३२ वडवणी ४३ एकूण ५९२

५५ कोटींचा नव्याने प्रस्ताव

५४१ वर्गखोल्यांच्या मोठ्या दुरुस्तीकरता १३ कोटी १४ लाख ६३ हजार रुपयांचा निधी व ५१९ धोकादायक वर्ग खोली बांधकाम व पत्र्याच्या शेडमध्ये भरणाऱ्या ३८ शाळांमध्ये ३८ वर्गखोली बांधकामासाठी असे एकूण ५५ कोटी ७० लाख रुपये निधी मिळण्यासाठी प्रस्ताव सादर करण्यात आलेले आहेत.

५९२ धोकादायक वर्गखोल्यांसाठी निधी मिळावा म्हणून शासनाकडे प्रस्ताव पाठवला आहे - भगवान फुलारी , शिक्षणाधिकारी प्रा.जि.प.बीड

जिल्ह्यातील ५९२ वर्गखोल्या धोकादायक असून त्या ठिकाणी अध्यापन करू नये असे मुख्याध्यापकांना कळविलेले असून तेथील विद्यार्थ्यांची पर्यायी व्यवस्था करण्यात आलेली आहे. शाळांना निधी मिळावा यासाठी आम्ही शासनाकडे प्रस्ताव पाठवलेला आहे. शासनाकडून अपेक्षित निधी मिळेल असे वाटते अशी प्रतिक्रिया शिक्षणाधिकारी प्रा.जि.प.बीड भगवान फुलारे यांनी दिली.



**दिंद्रुड - जवाहर नवोदय प्रवेश पूर्व परिक्षेत दिंद्रुडच्या जिल्हा परिषद प्राथमिक शाळेची विद्यार्थिनी गौरी ज्ञानेश्वर तांबे पात्र झाली. पुढील शिक्षणासाठी गढी या शाळेत निवड झाल्याबद्दल तिचा सत्कार तलाठी सज्जाचे तलाठी प्रमोद चव्हाण, विक्रम वनवे,ग्रा पं सदस्य अतुल चव्हाण, पत्रकार गणेश काटकर, मायदंळे यांनी केला.**



**बीड - बुलढाणा ता. चिखलीच्या भाजपा विधानसभा सदस्या तथा मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांचे खाजगी सचिव यांच्या सुवैद्य पत्नी आ.सौ.श्वेताजी विद्याधर महाले पाटील यांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा देतांना युवा नेते सुशांत सत्राळकर.**

**पान १ वरून...**

**तहसील कार्यालयात ...**

आली होती .बाहेर येऊन झाडाखाली काही वेळ बसल्या होत्या .परंतु त्यांना जास्त चक्कर आल्यामुळे ग्रामीण रुग्णालय धारूर येथे हलवण्यात आले .परंतु तेथे डॉक्टरांनी त्यांना मयत घोषित केले .या ठिकाणी कमलबाई यांना लाभार्थ्यांची मोठ्या प्रमाणात गर्दी झाल्याने तळमज्यातील कोंडवाड्यामुळेच त्यांचा मृत्यू झाल्याची चर्चा तहसील कार्यालयात दिवसभर होती .याबाबत तहसील प्रशासन मात्र कसले प्रकारची काळजी घेताना दिसत नाही .तहसीलदार श्रीकांत निळे यांना या लाभार्थ्यांची कसले प्रकारे देणे घेणे नसल्याची दिसून येत असून ही अनेक वेळा तक्रारी करूनही लाभार्थ्यांची काळजी घेत नाहीत .तहसीलदार श्रीकांत निळे यांच्याशी संपर्क साधला असता तहसील कार्यालयात काही तसे झालेच नसल्याचे सांगत उडवा-उडीची उत्तरे देण्यात आली .

फॅनची सुविधा नाही

तहसील कार्यालयाच्या तळमजल्यामध्ये केवायसी करण्यासाठी मोठ्या प्रमाणात गर्दी होत आहे .गुरुवारी सकाळी शंभर महिला तर १५० पुरुष लाभार्थ्यांची गर्दी अचानक झाली होती .एक दरवाजा उघडल्यानंतर तुंबड झाली होती .यामध्ये कमलबाई कसबे या महिलेला चक्कर आली होती .

- जयस खरात, कर्मचारी तहसील कार्यालय

मुलाची तक्रार

आईच्या मृत्यूला तहसील कार्यालय व तहसीलदार जिम्मेदारा असून जोपर्यंत त्यांच्यावर कार्यवाही होत नाही तोपर्यंत आम्ही अंत्यविधी करणार नसल्यासंदर्भात लेखी तक्रार तहसीलदार श्री निळे यांना मयताचा मुलगा सुभाष कसबे यांनी दिली आहे .

**तालुक्यातील मच्छिंद्रनाथ...**

कानिफनाथ गड) ते या ३.६ कि. मी. हवाई अंतरामध्ये रोप - वे बसविन्यास मान्यता दिल्याबद्दल राज्याचे मुख्यमंत्री श्री. देवेंद्रजी फडणवीस साहेब तसेच केंद्रीय मंत्री, श्री. नितीनजी गडकरी साहेब तसेच उपमुख्यमंत्री श्री. एकनाथजी शिंदे साहेब, उपमुख्यमंत्री श्री. अजितजी पवार साहेब यांचे खुप खुप धन्यवाद...!

**पान १ वरून...**

- सुरेश धस, आमदार

या प्रकल्पांमुळे बीड - नगर जिल्ह्याच्या पर्यटन विकासाला नवी दिशा मिळेल. ऐतिहासिक आणि धार्मिक स्थळांना भेट देणाऱ्या पर्यटकांची संख्या वाढेल. स्थानिक कला आणि संस्कृतीला प्रोत्साहन मिळेल. ग्रामीण भागातील लोकांना रोजगाराच्या नवीन संधी उपलब्ध होतील. राज्य सरकारच्या या निर्णयामुळे राज्यातील पर्यटन आणि दळणवळण क्षेत्रात मोठी सुधारणा होईल.

- सुरेश धस मच्छिंद्रनाथ देवस्थान विश्वस्त तथा आमदार

या प्रकल्पांची अंमलबजावणी राष्ट्रीय महामार्ग लॉजिस्टिक व्यवस्थापन लिमिटेड मार्फत होणार आहे. यासाठी राज्य सरकार आवश्यक ती मदत करणार आहे. 'पर्वतमाला' योजनेअंतर्गत रोपवे प्रकल्प दोन पर्यायांद्वारे राबवले जाणार आहेत. पहिला पर्याय जमिनीचा आहे. त्यानुसार सरकारी मालकीची जमीन एनएचएलएमएलला ३० वर्षांच्या भाडेतत्त्वावर दिली जाईल. इतर विभागांच्या मालकीची जमीन सार्वजनिक बांधकाम विभागाकडे हस्तांतरित करून ती एनएचएलएमएलला भाड्याने दिली जाईल. खासगी जमीन असल्यास ती संपादित करून एनएचएलएमएलला दिली जाईल.

**शुक्रवारी बीड येथे ...**

संघ बीडचे अध्यक्ष ॲड.उदयसिंह सालपे, माजी अध्यक्ष ॲड.राम औटे,ॲड. हुंबे मॅडम, ॲड. गलधर, ॲड.जाधव, ॲड.केंद्रे, ॲड.चव्हाण, ॲड.भवर, ॲड.बापुसाहेब जाधव, ॲड.कासट,ॲड.जायगुडे, ॲड.खोसे, ॲड.रायभुले, ॲड. जोगदंड, ॲड.कोकिळ, ॲड.डोळे, ॲड.आहिरे आदी उपस्थित होते. कार्यालयीन अधिक्षक मुंडे, कार्यालयीन कर्मचारी सुग्रीव सपकाळ, पठाण, बोंडे आदी उपस्थित होते.

**आ.संदीप क्षीरसागर ...**

करण्याचे काम करते. आ. क्षीरसागर यांनी यापूर्वी विधानसभेत अनेकदा बीड जिल्ह्यातील पाणीटंचाई, ग्रामीण विकास आणि सामाजिक प्रश्नांवर भाष्य केले आहे. त्यांच्या या नव्या भूमिकेमुळे त्यांना समितीच्या माध्यमातून राज्यस्तरीय धोरणांवर प्रभाव टाकण्याची संधी मिळणार आहे. त्यांच्या निवडीबद्दल त्यांचे समर्थक आणि पक्ष कार्यकर्त्यांनी आनंद व्यक्त केला आहे.

# वेठबिगारी ही वाईट प्रथा समाजातुन नष्ट झाली पाहिजे - न्या. आनंद यावलकर

बीड ।प्रतिनिधी

वेठबिगारी ही प्रथा समाजातुन नष्ट होण्यासाठी समाजातील प्रत्येक घटकाने प्रयत्न करणे गरजेचे आहे. वेठबिगारीतुन मूक्तता झाल्यानंतर त्यांच्या पुर्नवसनासाठी व कायदेशीर मदत मिळवुन देण्यासाठी जिल्हा विधी सेवा प्राधिकरण बीड यांचा विशेष सेल गत एक वर्षापासून खुप मोठया प्रमाणात काम केले आहे असे मत न्या. आनंद यावलकर यांनी व्यक्त केले.

बुधवार दिनांक २७ मार्च रोजी जिल्हा विधी सेवा प्राधिकरण बीड असंघटित कामगारांसाठी जिल्हास्तरीय विशेष सेल बीडने गत एक वर्षात केलेल्या कामकाजाचा आढावा व डॉक्युमेंटरी फिल्मचे उद्घाटनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यावेळी उद्घाटक म्हणुन न्या. आनंद यावलकर जिल्हा प्रमूख व सत्र न्यायाधिश बीड, तसेच प्रमुख पाहुणे म्हणुन नवनीत पोलिस अधिक्षक बीड, न्या. जी.जी.सोनी सचिव जिल्हा विधी सेवा प्राधिकरण बीड, ॲड.ब्रिटो माइकल नाडर, शिला पठत, ॲड. मिलींद वागीरकर, तत्वशिल कांबळे अधिकारमित्र ॲड. विकास बडे, अशोक तांगडे अध्यक्ष बालकल्याण समिती, सुखदेव चिंचोलीकर जिल्हा समन्वय अधिकारी महिला आर्थिक विकास महामंडळ बीड, भगवान फुलारी शिक्षण अधिकारी जिल्हा परिशद बीड, मिथुन जोगदंड अधिकारमित्र आदी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक ॲड.ब्रिटो माइकल नाडर यांनी केले यावेळी बोलताना ते म्हणाले की, आयजेएम संस्था ही वेठबिगारीची प्रथा नष्ट करण्यासाठी जिल्हा विधी सेवा प्राधिकरणासोबत काम करीत असुन कोणत्याही वेठबिगार किंवा असंघटित कामगारांना अडचणीत सापडल्यास अथवा मदतीची गरज भासल्यास सहाकार्य करण्यासाठी पुढाकार घेईल.यावेळी मनोगत व्यक्त करताना पुढे न्या. आनंद यावलकर म्हणाले की, ८० ते ९० जनजागृती शिबीरे आयोजित केली आहेत. सात वेठबिगारांना मूक्तता मिळवुन दिली आहे. व त्यांच्या पुर्नवसनासाठी कामही सुरू आहे. समाजातील प्रत्येक घटकाने याबाबत दक्षता घेतली पाहिजे की, कोणीही वेठबिगारीच्या चक्रात अडकु नये यासाठी प्रत्येक घटकाने प्रयत्ने करावेत असे आवाहन यावेळी केले.




यावेळी आपले मनोगत व्यक्त करताना नवनीत, पोलिस अधिक्षक, बीड म्हणाले की बीड जिल्हयातील वेठबिगारी प्रथा संपविण्यासाठी पोलीस प्रशासन सतत आपल्यासोबत आहे. बीड जिल्हयात वेठबिगारींच्या कोणालाही माहिती मिळाली अथवा अडचण आली तर आपण तात्काळ पोलीस यंत्रणेशी संपर्क साधावा. सर्व पोलिस स्टेशनचे नंबर आपण यापूर्वी जाहीर केलेले आहेत. यामूळे कोणीही न घाबरता पोलिस यंत्रणेशी संपर्क साधावा व वेठबिगारीची प्रथा संपवावी.यावेळी बोलताना अधिकारमित्र तत्वशील कांबळे म्हणाली की, जिल्हास्तरीय विशेष सेलच्या वतीने अधिकारमित्र म्हणुन गत एक वर्षात काम करताना ७ वेठबिगारांना मूक्तता मिळवुन दिलेली आहे.तसेच, जे गुन्हेगार आहेत त्यांच्याविरोधात गुन्हा दाखल केला आहे. तसेच गरीबीमूळे जे वेठबिगारीच्या चक्रात अडकतात त्यांना त्रासापासुन मुक्तता मिळावी यासाठी जिल्हा विधी सेवा प्राधिकरणच्या टोल फ्री नंबर १५१०० वर संपर्क साधुन मदत मिळवुन घ्यावी असे आवाहन केले.कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन हे ॲड.विकास बडे यांनी केले.

# ताराई महाविद्यालयाच्या रा.से.योजनेच्या वतीने रक्तदान शिबीर संपन्न




पैठण ।प्रतिनिधी

पैठण येथील ताराई कला व विज्ञान महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने युवा व माझा भारत आणि डिजिटल साक्षरता या विषयावर दि.२३ मार्च ते २९ मार्च २०२५ दरम्यान मायगाव, ता. पैठण या गावात सात दिवशीय विशेष शिबिराचे आयोजन करण्यात आलेले आहे. या शिबिरा दरम्यान महात्मा गांधी मिशन हॉस्पिटलच्या वतीने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिराचे उद्घाटन उपसरपंच अप्पासाहेब गिरगे , सामाजिक कार्यकर्ते किशोर दसपुते यांच्या हस्ते संपन्न झाले. याप्रसंगी निलेश दसपुते, प्लॅन्टो कृषीतंत्रचे तालुका प्रतिनिधी कृष्णा मस्के, निलेश सनवे, करण शेळके आदींची उपस्थिती होती.या रक्तदान शिबिरात महाविद्यालयातील प्राध्यापक, विद्यार्थी व गावकऱ्यांनी रक्तदान केले. एमजीएम चे डॉ. गौतम कोराने, डॉ. धीरज जैन, मनोज चव्हाण,अर्जुन चव्हाण,कडूबाळ चाबुकस्वार यांनी शिबिर आयोजनात महत्त्वाची भूमिका बजावली. शिबिराच्या यशस्वीतेसाठी स्वप्निल बलैय्या, अभिषेक सोरमारे, विशाल गायकवाड, तुषार बोबडे, ऋतुजा मापारी, निकिता भावले, गीता जालंद्रे, मोहिनी जावळे, निकिता औरंगे,बालाजी नेहरकर,मयुरी गायकवाड, विशाल नरवडे, प्रतीक कोल्हे, आदींनी प्रयत्न केले

# यंदाच्या कंकालेश्वर महोत्सवात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकरांचा जीवनपट उलगडणार !

बीड ।प्रतिनिधी

तब्बल २८ वर्षाची परंपरा लाभलेल्या कनकालेश्वर महोस्तवात यंदा पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जीवनचरित्रावरील नाटिका सादर केली जाणार आहे. नृत्य, नाटक,गवळण गायन आणि पखवाज वादनाने यावर्षी मराठी नववर्षाचे स्वागत केले जाणार आहे अशी माहिती संस्कार भारती बीडच्या संयोजकांनी दिली आहे.



संस्कार भारती बीड शाखेच्या वतीने गेल्या २८ वर्षांपासून कनकालेश्वर महोत्सव साजरा केला जातो चैत्रशुद्ध प्रतिपदा अर्थात पाडव्याच्या दिवशी मराठी नववर्षाचे स्वागत आगळ्यावेगळ्या पद्धतीने कंकालेश्वर मंदिराच्या जलाशयामध्ये केले जाते. या जलाशयामध्ये पाण्यावर तरंगणारा रंगमंच तयार करून त्यावर वेगवेगळ्या सांस्कृतिक कार्यक्रम घेतले जातात पुष्पवृष्टी करून हजारो नागरिकांच्या उपस्थितीत नववर्षाचे स्वागत केले जाते.

राज योगिनी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे यंदाचे त्रिशताब्दी जन्मवर्ष आहे. त्यानिमित्ताने त्यांच्या जीवनपटावर आधारित एक नाटिका सादर केली जाणार आहे तसेच कृष्णा साळुंखे यांचे पखवाज वादन आणि साई नृत्यलय बीडच्या वतीने तरंगत्या रंगमंचावर नृत्यविष्कार सादर केला जाणार आहे. या महोत्सवाचे उद्घाटन युवा नेते योगेश क्षीरसागर यांच्या हस्ते आणि पश्चिम क्षेत्र प्रमुख चंद्रकांत घरोटे, भरत लोळगे यांच्या प्रमुख उपस्थितीत आणि स्नेहल पाठक यांच्या अध्यक्षेतेखाली होईल. या कार्यक्रमात संस्कार भारतीचे माजी महामंत्री कुलदीप धुमाळे यांचा अमृत महोत्सवी सत्कार करण्यात येणार आहे.३० मार्च २०२५ रोजी कंकालेश्वर मंदिर परिसरात होणाऱ्या या दिमागदार सोहळ्याचे साक्षीदार होण्यासाठी हजारो बिडकर रसिकांनी सहभागी व्हावे असे आवाहन संस्कार भारती बीडच्या आयोजकांनी केले आहे.

# आदित्य कृषी व कृषी जैवतंत्रज्ञान महाविद्यालयाच्या १५ विद्यार्थ्यांची कॅम्पस इंटरव्ह्यू मधून निवड

बीड ।प्रतिनिधी

आदित्य शिक्षण संस्थेच्या आदित्य कृषी व कृषी जैवतंत्रज्ञान महाविद्यालयात २५ मार्च रोजी आयोजित कॅम्पस इंटरव्ह्यू मध्ये ६० विद्यार्थी सहभागी झाले होते. झायडेक्स इंडस्ट्रीज या नामांकित कंपनी त्यातील १५ विद्यार्थ्यांची निवड केली असून त्यांना १ मे पासून १ महिन्याचे प्रशिक्षण बडोदा येथे दिले जाणार आहे. त्यानंतर हे विद्यार्थी महाराष्ट्रासह गुजरातमध्ये सेवा देणार असून कंपनीने त्यांचा चांगले पॅकेज दिले आहे.

विद्यार्थ्यांची आकलन क्षमता वृद्धिंगत करणे, त्यांच्या नाविन्यपूर्ण कल्पनाशक्तीला पुरेशी नोकरीची संधी उपलब्ध करून देणे आणि पदवी शिक्षणाबरोबरच सामाजिक, शैक्षणिक व उद्योजकीय विकास रुजवणे अशा उदात्त हेतुने आदित्य शिक्षण संस्था कायम कार्यरत असते याचाच एक भाग म्हणून आदित्य शिक्षण संस्थेत झायडेक्स इंडस्ट्रीज या नामांकित कंपनी मार्फत घेण्यात आलेल्या कॅम्पस इंटरव्ह्यू मधून आदित्य कृषी महाविद्यालय व आदित्य कृषि जैवतंत्रज्ञान महाविद्यालयाच्या अंतिम वर्षात शिकत असलेल्या १५ विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली आहे.



## विद्यार्थी संधीचे सोनं नक्कीच करतील – डॉ. आदिती सारडा

आदित्य शिक्षण संस्था विद्यार्थ्यांना केवळ शिक्षण आणि पदवी देत नाही. तर त्यांचे करिअर घडवण्यासाठी प्रयत्न करत आहे. आज आदित्य शिक्षण संस्थेचे विद्यार्थी देशासह विदेशातील नामवंत कंपीनमध्ये, शासकीय सेवेत उच्च पदावर कार्यरत आहेत. झायडेक्स इंडस्ट्रीज कंपनीने आदित्य शिक्षण संस्थेच्या तब्बल १५ विद्यार्थ्यांना संधी दिली असून आमचे विद्यार्थी त्या संधीचे सोनं नक्कीच करतील - डॉ. आदिती सारडा, संचालिका आदित्य शिक्षण संस्था, बीड

आदित्य कृषी महाविद्यालय व आदित्य कृषि जैवतंत्रज्ञान महाविद्यालयाच्या ६० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला होता त्यापैकी १५ विद्यार्थ्यांची निवड झाली. यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन संस्थेचे मुख्य प्रवर्तक सुभाषचंद्र सारडा, संचालक डॉ.आदित्य सारडा, वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ परभणीच्या कार्यकारी सदस्या तथा आदित्य शिक्षण संस्थेच्या संचालिका डॉ. आदिती सारडा, आदित्य कृषी अन्न तंत्रज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. कल्याण अपेट, आदित्य कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य शाम भुतडा, आदित्य कृषि जैवतंत्रज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सतीश कचरे, आदित्य कृषी अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अमोल सानप, डॉ. प्रसाद खेडकर, डॉ.संदिप मोरे, डॉ. धनंजय सातपुते व प्लेसमेन्ट अधिकारी प्रा. प्रिया गव्हाने, प्रा. एस. आर. चव्हाण यांनी विद्यार्थ्यांचा सत्कार करून त्यांना शुभेच्छा दिल्या.

या विद्यार्थ्यांची झाली निवड...

आदित्य कृषी महाविद्यालयातील अमोल मोहरे, आदित्य मगर, रेवनात होलगे, मयूर गावडे, संदीप गोंडे, शंतनू मांजरे, अभिषेक गरड, शिवम गौतम, रवी पाटील, गणेश संकसंनवार, शिव प्रसाद नळे तर आदित्य कृषी जैवतंत्रज्ञान महाविद्यालयाचे अनिकेत सपकाळ, अमोल तायडे, देवकते बाळकृष्ण, रामकृष्ण यादव

# जलजीवन मिशन अंतर्गत झालेल्या भ्रष्टाचाराची चौकशी करण्यात यावी – आमदार श्री नारायण कुचे

## जलजीवन मिशन योजनेच्या गैरव्यवहाराची एसआयटी नेमून चौकशी करण्यात यावी – आमदार श्री नारायण कुचे

जालना ।प्रतिनिधी

आपल्या देशाची पंतप्रधान नरेंद्र भाई मोदी यांचे स्वप्न आहे की हर घर जल हर घर नल म्हणून त्यांनी जल जीवन मिशन ही योजना आणली. ज्या गावांमध्ये जल जीवन अंतर्गत योजना मंजूर होईल व काम पूर्ण होईल त्या गावात भविष्यात तीस वर्ष कोणतीही पाणीपुरवठ्याची योजना राबविण्यात येणार नाही. असे असताना आज रोजी माझ्या मतदार संघातील बदनापूर तालुका असेल अंबड तालुका असेल किंवा माझ्या मतदारसंघातील भोकरदन चा काही भाग असेल अथवा जालना जिल्हा असेल या योजनेची अवस्था आज काय झाली आहे. आज माझा बदनापूर तालुका असेल भोकरदन तालुका असेल किंवा अंबड तालुका असेल हा भाग अवर्षण प्रवन भाग आहे. या अवर्षण प्रवण भागात ही योजना कुठेही पूर्णत्वास गेल्याचे दिसून येत नाही. असेच चित्र राज्याचे देखील आहे. हा प्रश्न एकट्या बदनापूर मतदारसंघाचा नाही किंवा जालना जिल्ह्याचा नाही, तर संपूर्ण राज्याचा प्रश्न झालेला आहे. संपूर्ण राज्यात या योजनेची वाटोळे जर कोणी केले असेल तर जिल्हा परिषदेच्या प्रशासनाने केलेली आहे. त्यामध्ये उपअभियंता असतील, कार्यकारी अभियंता असतील किंवा जिल्हाभर टेंडर घेत फिरणारी ठेकेदार आणि वेबकोस ही कंपनी असेल यांनी हे वाटोळे केले आहे, वेबकॉस ही जी कंपनी आहे त्यांच्याकडे योजनेचा आराखडा करणे, सर्वेक्षण करणे, प्रत्यक्ष कामाची



अंमलबजावणी करताना मार्गदर्शन करणे, मोजमाप करणे व त्याचे देयके सादर करणे, हे काम या कंपनीचे आहे. परंतु हे काम यांच्याकडे असताना या कंपनीच्या कर्मचाऱ्यांनी व कार्यकारी अभियंता, उपअभियंता यांनी या योजनेचे वाटोळे केले असल्याचे हि आमदार कुचे म्हणाले आमच्या जालना जिल्ह्यात जल जीवन मिशन योजनेमध्ये झालेल्या भ्रष्टाचारात या कंपनीचा, पाणीपुरवठा विभागाच्या अधिकाऱ्यांचा व जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांचा सुद्धा सहभाग असल्याच्या चर्चा जिल्हा प्रशासनात आणि सामान्य जनतेमध्ये मोठ्या चवीने चर्चिल्या जात असल्याचेही त्यांनी यावेळी सभागृहात सांगितले, जिल्हा परिषदेवर सध्या प्रशासक असल्यामुळे जिल्हा जलसंधारण समितीचे अध्यक्ष या नात्याने प्रशासक म्हणजेच मुख्य कार्यकारी अधिकारी हेच याचा कारभार पाहत आहेत. जिल्हा परिषद अस्तित्वात नसल्यामुळे मुख्य कार्यकारी अधिकारी, मुख्य वित्त व लेखाधिकारी व कार्यकारी अभियंता यांच्यावर कोणाचीही नियंत्रण राहिलेले नसल्याचेही ते यावेळी म्हणाले, जल जीवन मिशन च्या बाबतीत प्रशासकांनी मनमानी कारभार केला, सदस्यांचा वचक नसल्याने मर्जीतील एका एका गुत्तेदारास २५ ते ३० गावांचे कामाचे ठेके दिले गेले. एका एका गुत्तेदारास १०० कोटींच्या वर कामे देण्यात आले. माझ्या एका बदनापूर तालुक्यात १५० कोटींपेक्षा जास्त रकमेची कामे मंजूर असून अनेक गावांमध्ये या योजना मंजूर केले गेले. जल जीवन मिशन या योजनेअंतर्गत पाच कोटीच्या मर्यादेच्या आत कामांना मंजुरी देण्याचा अधिकार जिल्हा परिषदेला आहे आणि जिल्हा परिषदेच्या कामांसाठी वेबकॉस या कंपनीला मंजूर या दिले व त्यांनीच ठेकेदार ठरवले असल्याचे हि आमदार कुचे म्हणाले बदनापूर मतदारसंघातील व जालना जिल्ह्यातील या योजनेच्या कामांमध्ये झालेल्या गैरव्यवहाराची चौकशी करावी, या योजनेतील गैरव्यवहाराची एसआयटी नेमून चौकशी करण्यात यावी, या योजनेतील सर्व कामांची अंमलबजावणी एसी केबिन मध्ये बसून कोणतेही काम प्रत्यक्ष पर्यवेक्षण न करता गुपचूप चे व्यवहार करून देयके अदा करणाऱ्या कार्यकारी अभियंता व उपअभियंता यांची तात्काळ चौकशी करण्यात यावी, व संबंधित ठेकेदार यांची चौकशी करून त्यांना काळी यादीत टाकण्यात यावे, आणि ही चौकशी पूर्ण होईपर्यंत संबंधित अधिकाऱ्यांचे निलंबन करण्यात यावे, वेबकॉस कंपनीच्या कर्मचाऱ्यांनी व प्रशासकीय अधिकारी आणि ठेकेदारांनी व्यक्तिगतिक संबंध जपण्यासाठी योग्य जागा न निवडता मर्जीतील पुढाऱ्यांच्या शेतामध्ये विहीर खोदल्या त्यांची चौकशी करण्यात यावे असा प्रश्न यावेळी विधानसभा सभ्गृहात आमदार श्री कुचे यांनी मंत्री महोदयांना यावेळी केला.



# उष्णतेच्या लाटेपासून विद्यार्थ्यांनी सावधान रहावे...!–प्राचार्य राऊत डी.डी.

वडवणी ।प्रतिनिधी

महाराणी ताराबाई माध्यमिक.व उच्च माध्यमिक विद्यालय वडवणी येथे २६ मार्च बुधवार रोजी सर्व विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना प्राचार्य राऊत डी.डी. म्हणाले की महाराष्ट्र शासनाने २१ मार्च २०२५ रोजी एक शासन आदेश काढून उष्णतेच्या लाटेपासून विद्यार्थ्यांना कसे परावृत्त करता येईल अशा विधायक कल्पना व सूचना मांडल्या आहेत.

यावेळी बोलताना प्राचार्य राऊत डी. डी. म्हणाले की, विद्यार्थी मीत्रहो ...! शासनाने विद्यार्थ्यांना उष्णतेच्या लाटेपासून दूर राहण्यासाठी सुचित्त केले आहे. कोणत्याही अस्थापनेने दुपारच्या सत्रात परीक्षा ठेऊ नयेत. विद्यार्थ्यांनी शाळेला येताना थंड पाण्याची बॉटल सोबत ठेवावी. डोक्यावर कॅप अथावा डोके झाकले जाईल आसे अच्छादन असावे. दुपारी १२.००ते ३.०० च्या दरम्यान कोणीही घराबाहेर पडू नये. शालेय तासीका – खेळ –क्रिडांगणावर घेऊन येत.

तसेच उष्णतेपासून बचाव करण्यासाठी, लिंबू–शरबत ,खरबुज, टरबुज द्राक्षे, संत्री यासारखी पेय घ्यावीत, सतत पाणी प्यावे, जठड च्या पुड्यांचा पाण्यात टाकून पिव्यासाठी वापर करावा. रात्री खिडक्या उघड्या ठेवाव्यात व दिवसभर उष्णतेच्या झळा घरात पोहचणार नाहीत म्हणून दारे बंद ठेवावीत. याप्रमाणे विधायक सुचना लक्षात घेतल्यास उष्मा घातापासून बचाव होऊ शकतो अशा प्रकारचे विचार प्राचार्य राऊत डी.डी यांनी व्यक्त केले. यावेळी संस्कार शिक्षण मंडळाचे संचालक ए.के.आंधळे ,उप मु.अ.मस्के ए.आर.,पर्यवेक्षक धाईतिडक पी.एम.व सर्व कर्मचारी व इयत्ता आ५वी ते ९वी व ११वीचे विद्यार्थी उपस्थित होते.उष्णतेच्या लाटेपासून विद्यार्थ्यांनी सावधान असावे कारण या दशकातील सर्वात जास्त उष्णता बाहेर पडत आहे दिनांक २७मार्च ते ३१ मार्चच्य दरम्यान उष्णतेचा पारा अति उच्च पातळीवर जात आहे आसे अवाहन हवामान शास्त्रज्ञांनी केले आहे.

# बाभळी बंधारा बुडीत क्षेत्रातील शेतकऱ्यांना मंजूर झालेल्या १८८ कोटीचा मावेजा तात्काळ वाटप करा – नारायण पाटील पवार

धर्माबाद / अशोक पडोळे

धर्माबाद तालुक्यातील बाभळी बंधारा बुडीत क्षेत्रातील सुमारे ३६५ हेक्टर जमीन शेतकऱ्यांना मंजूर झालेल्या १८८ कोटी मावेजा मिळाला नाही छत्रपती संभाजीनगर येथील मंत्रिमंडळ बैठकीत ही रक्कम मंजूर करण्यात आली आणि तातडीने शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा करण्यात यावे, अशी सूचना देण्यात आली पण अद्यापही शेतकऱ्यांना मावेजा मिळाला नाही. उच्च पातळी बाभळी बंधारा कार्यकक्षेत या जामिनी बुडीत क्षेत्र म्हणून गेल्या. गेल्या दहा वर्षापासून लाभमिळाला नव्हता मराठवाडा मुक्ती संग्राम अमृत महोत्सव निमित्त १६ सप्टेंबर २०२३ रोजी तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत मराठवाड्यासाठी ऐतिहासिक निर्णय घेण्यात आला. तथा नरसी येथे २३/३/२०२५ रोजी झालेल्या राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या मेळाव्यात उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या कडे या विषयावर चर्चा देखील झाली.शेतकरी बांधवांना या रास्त मागणीला न्याय देत नैसर्गिक न्याय देत १८८ कोटी रुपयांचा जमा असलेला निधी बाधित शेतकरी बांधवांना त्वरित वाटप करण्यासाठी प्रशासनाला आदेशित करावे अशी शेतकऱ्यांनी विनंती केली आहे.

बुडीत क्षेत्राखाली जमिनी गेल्या त्याचा मावेजा म्हणून १८८ कोटी ६२ लक्ष रुपये प्रस्तावित करून ही रक्कम मंजूर करण्यात आली पण पुढे काय ? घडले हे मात्र कळेनासे झाले आहे.या गोष्टीला एक वर्षा पेक्षा अधिकचा कार्यकाळ लोटत आला असला तरी सदरील गोष्टीची पूर्तता अद्याप झाली नाही १६ ऑक्टोबर २०२३ रोजी शासन निर्णय काढून उपरोक्त बाभळी बंधाऱ्याच्या विकासासंदर्भात तरतूद करण्यात आली व ७७१कोटी २ लक्ष रुपयांची मान्यता देण्यात आली.

पण अद्यापही त्यासंदर्भात कुठलीच कार्यवाही होत नाही म्हणून राज्याचे उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री अजित दादा पवार यांच्याकडे बुडीत क्षेत्रातील शेतकरी लाभार्थ्यांना त्वरित तात्काळ मावेजा मिळावा अशी मागणी धर्माबाद राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे कार्याअध्यक्ष नारायण पाटील पवार यांनी केली आहे .प्रशासकीय अधिकारी मंडळीनी निधीचे वाटप रखडत ठेवलेले आहे का ?बळेगाव साखळी बंधारा बाभळी बंधाऱ्याच्या नंतर अस्तित्वात येऊन देखील ही तेथील बुडीत क्षेत्राखालील येणाऱ्या शेतकरी बांधवांना बळेगाव बंधाऱ्याचे काम सुरुवात करण्यापूर्वीच मावेजा वाटप करण्यात आलेला आहे. फक्त तांत्रिक बाबीची सबब दाखवून प्रशासकीय अधिकारी मंडळी बंधाऱ्याच्या १८८ कोटी रुपयाचा जमा असलेल्या निधीचे वाटप रखडत ठेवलेले आहे का ? गांभीर्याने विचार व्हावा. शेतकऱ्यांना न्याय मिळवून द्यावा अशी मागणी धर्माबाद राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे कार्याअध्यक्ष नारायण पाटील पवार यांनी केली आहे.



# महत्त्वाचे १२ कायदे मंजूर, अर्थसंकल्पावर सकारात्मक चर्चा - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

मुंबई ।प्रतिनिधी

महाराष्ट्र विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात एकूण १२ महत्त्वाचे कायदे मंजूर करण्यात आले असून,दरदिवशी सरासरी ९ तास कामकाज चालले. राज्यासमोरील महत्त्वाच्या प्रश्नांवर विस्तृत चर्चा झाली. सरकारने चर्चेला सकारात्मक प्रतिसाद दिला असून, विरोधी पक्षालाही त्यांच्या मुद्द्यांसाठी संपूर्ण संधी देण्यात आल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अर्थसंकल्पीय अधिवेशन संस्थगित झाल्यानंतर आयोजित पत्रकार परिषदेत सांगितले.

यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, इतर मागास बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे, राज्यमंत्री आशिष जयस्वाल उपस्थित होते.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, या अधिवेशनात महत्वाच्या विधेयकांमध्ये माथाडी कामगार कायद्यातील सुधारणा विधेयकाचा समावेश असून या विधेयकामुळे बनावट माथाडी आणि ब्लॅकमेलिंग रोखण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.महाराष्ट्र खासगी सुरक्षा रक्षक विधेयक आणि विनियोजन विधेयकासह अनेक महत्त्वाची विधेयके संमत करण्यात आली. या अधिवेशनात संविधानावर विशेष चर्चा झाली, तसेच अर्थमंत्री यांनी ली शेती, उद्योग, पायाभूत सुविधा, रोजगार आणि सामाजिक विकास या पंचसूत्रीवर आधारित अर्थसंकल्प सादर केला आहे,जो महाराष्ट्राच्या विकासाला नवी गती देईल.मुख्यमंत्री यांनी अधिवेशनाच्या यशस्वीतेबद्दल सर्व आमदार, मंत्री, पिठासीन अधिकारी, विधानमंडळ कर्मचारी आणि माध्यमांचे आभार मानले.

१३ कोटी लोकांच्या विकासाचा अर्थसकंल्प - उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले की,सर्व कल्याणकारी योजना सुरू ठेवून अर्थव्यवस्था बिघडू न देता अर्थसकंल्प सादर केला.राज्यातील १३ कोटी लोकांच्या विकासाच्या दृष्टीने विचार करून अर्थमंत्री अजित पवार यांनी अतिशय चांगला अर्थसंकल्प सादर केला. विकासाचे आणि लोकाभिमुख प्रकल्प शासन राबवित आहे. शेतकरी, कष्टकरी , कामगार वर्ग या सर्व घटकांचा विचार राज्य चालवताना करत आहोत.

## माझी शाळा, सुंदर शाळा या उपक्रमात नागनाथ विद्यालय प्रथम तर पिंपळवाडी विद्यालय द्वितीय

बीड ।प्रतिनिधी

मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा २०२४-२५ या अभियानांतर्गत बीड तालुक्यात गुणानुक्रमाणे प्रथम मोरगाव येथील नागनाथ विद्यालय तर पिंपळवाडी विद्यालयाने द्वितीय क्रमांक मिळवला आहे. मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा २०२४-२५ या अभियानांतर्गत मोरगाव येथील नागनाथ विद्यालयाचा प्रथम क्रमांक आला तर पिंपळवाडी विद्यालय, पिंपळवाडी या शाळेचा द्वितीय क्रमांक आला आहे. त्याबद्दल आदर्श शिक्षण संस्थेचे सचिव माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर, युवा नेते रोहित क्षीरसागर, संस्थेचे प्रशासन अधिकारी राजा मचाले, कार्यवाहक एम.ए.राऊत, नागनाथ माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक दत्तात्रय माटे, पिंपळवाडी विद्यालयाचे मुख्याध्यापक प्रदिप जगताप, ग्रामस्थ मंडळी आणि शाळेच्या कर्मचार्यांनी अभिनंदन केले.

# महामानव महिला नागरी पतसंस्थेच्या निवडी बिनविरोध

**महामानव महिला नागरी पतसंस्थेच्या अध्यक्षपदी कौशल्या भोले, उपाध्यक्षपदी रेश्मा आठवले, तर सचिवपदी कावेरा इनकर यांची बिनविरोध निवड**

बीड ।प्रतिनिधी

बीड येथील महामानव महिला नागरी सहकारी पतसंस्थेची संचालक मंडळाची निवडणूक (२०२५-२०३०) बिनविरोध संपन्न झाली. संचालकानी नुतन पदाधिकारीची निवड बिनविरोध केली. अध्यक्षपदी कौशल्य गुलाबराव भोले, उपाध्यक्षपदी रेश्मा राजाभाऊ आठवले तर सचिवपदी कावेरा गौतम इनकर यांची निवड करण्यात आली. पतसंस्थेच्या नवनिर्वाचित संचालक मंडळाची बैठक पिठासीन अधिकारी पी.एस. रोडे यांच्या उपस्थितीत दि. २०/०३/२०२५ रोजी संपन्न झाली. सर्व संचालकांनी अध्यक्ष उपाध्यक्ष व सचिव पदाची निवडणूक बिनविरोध करण्याचे जाहीर केले. सदर बैठकीस नवनिर्वाचित संचालिका नंदाबाई दळवी,विजया जौजांळ, विद्या डोळस,वंदना वाघमारे व प्रभारी व्यवस्थापक पूजा जोंजाळ उपस्थित होत्या. महामानव अभिवादन ग्रुप , पतसंस्थेचे ज्येष्ठ सभासद डी.जी.वानखेडे, जी.एम.भोले, ए.बी. जौजांळ, डी.एम.राऊत, एस.एस.सोनवणे, के.एस.वाघमारे, प्रा.अशोक गायकवाड, सुजाता वासनीक, प्रशांत वासनिक, यांनी नवनिर्वाचित पदाधिकारी व संचालीका यांचा सत्कार केला. व पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या.

# गेवराई पंचायत समितीचे कर्मचारी आयकार्ड विणा ; गटविकास अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष

**कार्यालयात कोणाचा धकाच नाही,बायोमॅट्रिक पद्धत अंमलबजावणीच करा - जनतेतून मागणी**

गेवराई ।प्रतिनिधी

शासनाने सर्व कार्यालयातील अधिकारी आणि कर्मचारी यांना ओळखपत्र वापरण्यासाठी दिले आहे परंतु गेवराई पंचायत समितीच्या गटविकास अधिकारी यांच्या दुर्लक्षामुळे कोणत्याच अधिकाऱ्याकडे ओळखपत्र दिसत नसल्याने कोण अधिकारी हेच समजत नसल्याने तालुक्यातून काम घेवून आलेल्या जनतेला नाहक त्रास सहन करावा लागतो याकडे जिल्हाधिकारी आणि मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी लक्ष देण्याची आवश्यकता आहे.

जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुका झाल्या नसल्याने कार्यालयातील अधिकारी आणि कर्मचारी यांच्यावर कोणाचाच अंकुश राहिला नसल्याचे चित्र दिसून येत आहे. गेवराई पंचायत मध्ये सद्या सामान्य जनतेला प्रत्येक कामासाठी चकरा माराव्या लागत आहेत,वैयक्तिक कामे वेळेवर होत नसल्याने नागरिक त्रास सहन करत आहेत,त्यामुळे लोकप्रतिनिधी यांनी पंचायत चा कारभाराकडे लक्ष देवून जनतेची होणारी हेळसांड थांबवावी अशी मागणी जनतेतून अनेक वेळा झाली आहे.मागील झालेल्या विधानसभा निवडणुकी नंतर आमदार विजयराजे पंडित यांनी पंचायत समितीमध्ये जनता दरबार घेतला यावेळी तालुक्यातील अनेक गावातील पदाधिकारी,कार्यकर्ते आणि सामान्य नागरिकांनी आपल्या समस्या आमदार यांना सांगितल्या व कार्यालयामध्ये कामे वेळेवर होत नसल्याचे ही सांगितले त्यावर आमदार विजय राजे पंडित यांनी कार्यालयातील गटविकास अधिकारी यांच्या समवेत सर्व कर्मचारी यांनी सूचना देवून सर्वांची कामी करा,कोणाचीही अडवणूक करू नका अशा सूचना दिल्या आहेत,तसेच माजी आमदार अमरसिंह पंडित हे दे सोमवार रोजी पंचायत समिती कार्यालयात येऊन सामान्य जनतेची कामे सोडवण्यास प्राधान्य देत आहे,परंतु इतर वेळी हे अधिकारी आणि कर्मचारी हे लोकांची अडवणूक करत कामे रोखत असल्याचे दिसून येत आहे,आमचे कोणी काहीच करत नाही अशा आविर्भावात वागत असून शासनाची दिलेली ओळखपत्र घालणे ही टाळत आहेत त्यामुळे कोण अधिकारी आणि कर्मचारी हे समजत नाही त्यासाठी सर्व अधिकारी आणि कर्मचारी यांना ओळखपत्र घालणे बंधनकारक करून वेळेवर कार्यालयात उपस्थित राहण्यासाठी बायोमेट्रिक हजेरी घ्यावी अशी मागणी जनतेतून होत आहे.याकडे लोकप्रतिनिधी आणि वरिष्ठ अधिकारी लक्ष देतील का हे पाहावे लागेल.

# चला जाणुया नदीला अभियान

**बोबाटी नदी संवाद परिक्रमा आज विडा ग्रामपंचायतपासून**

**बीड ।प्रतिनिधी**

**भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षाचा उमक्रम असलेल्या चला जाणूया नदीला या उपक्रमांतर्गत उद्या शुक्रवार दि. २८ मार्च २०२५ रोजी बोबाटी नदी संवाद परिक्रमा चे उद्घाटन जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांच्या हस्ते होत आहे.राज्यातील नद्या अमृतवाहिनी करण्याचा संकल्प या उपक्रमात करण्यात आला आहे. यात उद्या केज तालुक्यातील विडा ग्रामपंचायत येथे सकाळी ९.३० वाजता हे उद्घाटन होईल. यावेळी या अभियानाचे राज्यस्तर सदस्य अनिकेत लोहिया, अभियानाचे सचिव विभागीय वनाधिकारी ए.बी. गर्कळ यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.**

ही *नदी पुनरुज्जीवन, जनजागृती व नदीच्या समस्या अभ्यासण्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण ठरणार आहे. या यात्रेत **नदी क्षेत्रातील तज्ज्ञ, सामाजिक कार्यकर्ते व शासन अधिकारी* मार्गदर्शन करणार आहेत. या संवाद यात्रेसाठी इंडिया वॉटर पार्टनरशिप व सर्वज्ञ करिअर अकॅडमी केज इतर भागीदारी संस्थेचे सहकार्य लाभत आहे.

- नदी साक्षरता वाढवणे व जनजागृती करणे
- नदीचे आरोग्य, जैवविविधता आणि भूजलस्तर सुधारण्यासाठी उपाययोजना ठरवणे
- नदीच्या अतिक्रमण, शोषण आणि प्रदूषणावर नियंत्रणासाठी उपाय शोधणे

यात्रेच्या दरम्यान *नदी पुनरुज्जीवनावर तज्ज्ञांचे मार्गदर्शन तसेच कला पथकाद्वारे सांस्कृतिक व जनजागृतीपर कार्यक्रम* होणार आहेत. विडा, पिंपळगाव, सारणी सांगावी, सिंधी, काळेगाव, अरणगाव, जाधव जवळा, मस्साजोग, उत्तरेश्वर पिंपरी, कापरेवाडी, केवड, बेळगाव, सारुखवाडी, डोका, हदगाव, वरपगाव येथील *शेतकरी, ग्रामस्थ, शालेय विद्यार्थी, युवक मंडळे, शासकीय अधिकारी व सामाजिक संस्था* यांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन युवा ग्राम विकास मंडळ संस्थेचे एचपी देशमुख व संतोष रेपे यांनी केले.

# संदीप भंडारी यांची जैन अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळ, महाराष्ट्र शासनाच्या समन्वयकपदी नियुक्ती

जालना ।प्रतिनिधी

जैन समाजाच्या धार्मिक, सामाजिक, शैक्षणिक आणि आर्थिक सक्षमीकरणासाठी महाराष्ट्र शासनाच्या वतीने स्थापन झालेल्या जैन अल्पसंख्यक आर्थिक विकास महामंडळ च्या समन्वयकपदी भाजपा जैन प्रकोष्ठचे प्रदेशाध्यक्ष संदीप भंडारी यांची नियुक्ती करण्यात आली आहे.



महामंडळाच्या प्रमुख उद्दिष्टांमध्ये राज्यातील जैन समाजाच्या कल्याणासाठी आणि सामाजिक सक्षमीकरणासाठी प्रभावी योजना राबवणे यावर भर दिला जाणार आहे. विशेषतः, अल्पव्याज दराने स्वयंरोजगारासाठी कर्ज उपलब्ध करून देणे, जैन तीर्थांचे संरक्षण व संवर्धन, जैन ग्रंथांचे पुनर्लेखन आणि जतन करणे, कायम पायी विहार करणाऱ्या जैन साधू-संतांसाठी सुरक्षा व्यवस्था निर्माण करणे, तसेच आर्थिक दुर्बल जैन विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती व शैक्षणिक कर्ज योजना राबवणे या महत्त्वपूर्ण उपक्रमांवर भर दिला जाणार आहे.महिला सक्षमीकरणाच्या दृष्टीने विधवा आणि परित्यक्ता जैन महिलांसाठी विशेष योजनांची अंमलबजावणी करण्यात येणार असून, समाजातील शेवटच्या घटकापर्यंत या सुविधांचा लाभ पोहोचवण्याचा महामंडळाचा प्रयत्न राहील.महामंडळाचे अध्यक्ष ललित गांधी यांच्या नेतृत्वाखाली या योजना प्रभावीपणे राबवण्याचा निर्धार करण्यात आला आहे. योजनांची परिणामकारक अंमलबजावणी आणि व्यापक समाज सहभाग वाढवण्यासाठी लवकरच राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये जिल्हा समित्यांची स्थापना केली जाईल, अशी माहिती संदीप भंडारी यांनी दिली.

या नियुक्तीबद्दल जैन समाजात आनंद व्यक्त केला जात असून, संदीप भंडारी यांचे भाजपा जैन प्रकोष्ठ घनसावंगी विधानसभा समन्व्यक नरेंद्र जोगड, भाजपा जैन प्रकोष्ठ मयूर बाकलीवाल, भोकरदन विविध संघटनांच्या पदाधिकाऱ्यांनी आणि समाजबांधवांनी अभिनंदन केले आहे.

# शासकीय आर्थिक व्यवहारांकरिता

**३० आणि ३१ मार्च रोजी भारतीय स्टेट बँक रात्री १२.०० वाजेपर्यंत सुरु ठेवण्यात येणार**

बीड ।प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील सन २०२४-२०२५ आर्थिक वर्षाचे शासकीय व्यवहार पूर्ण करण्यासाठी दिनांक ३० मार्च २०२५ रोजी व दिनांक ३१ मार्च २०२५ रोजी बीड कोषागार तसेच अधिनस्त सर्व उपकोषागार कार्यालय तसेच भारतीय स्टेट बँक व इतर सर्व शासकीय व्यवहार करणाऱ्या बँकेच्या शाखा रात्री १२.०० वाजेपर्यंत चालू ठेवण्याबाबत जिल्हाधिकारी बीड यांनी आदेशित केलेले आहे.

बीड जिल्ह्यातील सर्व आहरण व संवितरण अधिकारी यांनी अचूक देयके कार्यालयीन वेळेत सादर करून दिनांक ३१ मार्च २०२५ रोजी रात्री १२.०० वाजेपर्यंत देयकाबाबतची कार्यवाही पूर्ण करून घ्यावी, त्यानंतर सन २०२४-२०२५ चे आर्थिक व्यवहार बंद करून नवीन आर्थिक वर्ष २०२५-२०२६ या वर्षाचे कामकाज सुरू करण्यात येईल याची बीड जिल्ह्यातील सर्व आहरण व संवितरण अधिकारी यांनी नोंद घ्यावी, असे आवाहन जिल्हा कोषागार अधिकारी लहू पाडुरंग गळगुंडे बीड यांनी केले आहे.




# माजी प्राचार्य शिवाजीराव नवरखेले यांना अमेरिके च्या विद्यापीठाची डॉक्टरेट मिळाल्याबद्दल झाला सत्कार

**गुरूवर्य योगी अंतराम महाराज व राजेसाहेब देशमुख यांच्या हस्ते झाला सन्मान**

केज/प्रतिनिधी

माजी प्राचार्य शिवाजीराव नवरखेले यांना अमेरिके तील वाशिंग्टन डिजिटल विद्यापीठाने शैक्षणिक व सामाजिक कार्याचीदखल घेवुन नवरखेले यांना डॉक्टरेट देवुन सन्मानित केले आहे.त्यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल ओम हंस योगाच्या प्रतिष्ठान आश्रम ब्रम्हपुरी ता.चाकुर यांच्या वतीने गुरुवर्य योगी अंतराम महाराज यांच्या हस्ते शाल,श्रीफळ व पुष्पहार देवून सत्कार करण्यात आला.या प्रसंगी प्रमुख पाहुणे माजी शिक्षण सभापती राजेसाहेब देशमुख,न्यू.इंग्लीश स्कुल चे प्राचार्य प्रसाद नवरखेले,बाळासाहेब जगताप,सतिशरावजाधव,महादेव बरकते,डॉ.सुधीर आगळे हे उपस्थित होते.या कार्यक्रमाचे सुत्र संचलन संजयकुमार पांचगे यांनी तर आभार प्रदर्शन गोविंद कांबळे यांनी केले.

# रोजगार क्षमता विकास कार्य शाळेचे स्वामी रामानंद तीर्थ महाविद्यालयात आयोजन

अंबाजोगाई ( प्रतिनिधी)

येथील कृष्णाजी पुरुषोत्तम चौसाळकर योगेश्वरी तंत्र निकेतन महाविद्यालय व स्वामी रामानंद तीर्थ महाविद्यालयाच्या ट्रेनिंग व प्लेसमेंट सेल व इंटरप्रिटेशनशिप डेव्हलपमेंट सेल यांच्या संयुक्त विद्यमाने सहा दिवसीय रोजगार क्षमता विकास कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले . या कार्यशाळेचे उद्घाटन पुणे येथील मेडिकल इलेक्ट्रॉनिक विषयातील तज्ज्ञ आकाश बाबासाहेब मिसाळ यांनी केले. महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी आपले नियमित शिक्षण घेताना रोजगाराच्या संधी शोधल्या पाहिजेत असे मत व्यक्त केले. स्वयंरोजगार, नौकरी मिळविण्यासाठी विशिष्ट प्रकारची क्षमता विकसित केली तर संधी चालून येतील असे मत श्री



आकाश मिसाळ यांनी व्यक्त केले. या कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप योगेश्वरी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष चंद्रशेखर बर्दापूरकर यांच्या संबोधनाने झाला. विद्यार्थ्यांना केवळ पुस्तकी ज्ञान न देता त्यांच्या क्षमतांचा विकास केला गेला पाहिजे असे मत त्यांनी व्यक्त केले. विद्यार्थी ज्ञानार्जनाने परिपूर्ण झाला त्याच्या क्षमतांचा विकास झाला तर प्रगतीची अनेक द्वारे खुली होतील असे मत चंद्रशेखर बर्दापूरकर यांनी व्यक्त केले. या कार्यशाळेच्या उद्घाटनाच्या सत्रात महाराष्ट्र उदयगिरी महा विद्यालयातील आय . क्यू. ए. सी. विभागाचे प्रमुख डॉ. कमलाकर गव्हाणे यांनी तज्ञ मार्गदर्शक म्हणून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. डॉ. आकांक्षा भांजी तसेच डॉ. नितीन डोके दयानंद वाणिज्य महाविद्यालय, लातूर.प्रा. डॉ. संजय साळुंके लो. टिळक महाविद्यालय, वडवणी यांनी तज्ज्ञ मार्गदर्शक म्हणून मार्गदर्शन केले. या कार्यशाळेचे यशस्वीपणे आयोजन करण्यांत महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पी.आर. थारकर, उपप्राचार्य डॉ. रमेश सोनटक्के,इंग्रजी विभाग प्रमुख डॉ.धनाजी आर्य, वाणिज्य विभागातील सहयोगी प्राध्यापिका डॉ. ममता राठी तसेच कृष्णाजी पुरुषोत्तम चौसाळकर योगेश्वरी तंत्र निकेतनचे प्राचार्य डॉ. रमण देशपांडे यांनी महत्वाचे योगदान दिले.

# वैद्यनाथ आर्टस,कॉमर्स अँड सायन्समहाविद्यालय परळी येथील विद्यार्थ्यांना गुंतवणूकदार जागृतीचा कार्यक्रम संपन्न

बीड/प्रतिनिधी

विद्यार्थी सुशिक्षित होतात मात्र प्रत्येक विद्यार्थी आर्थिक साक्षर असेलच असे नाही आर्थिक साक्षरता होणे काळाची गरज आहे,आपला पैसा कुठे व कसा गुंतवायचा, पैसे कसे कमवायचे, आलेल्या पैशाचे नियोजन कसे करायचे याचे ज्ञान विद्यार्थी दशेत मिळाले तर भविष्यामध्ये तो विद्यार्थी कधीच आर्थिक अडचणीत येणार नाही यासाठी संस्थेच्या प्राचार्य डॉ.सौ.ए.आर.चव्हाण मॅडम यांच्या नेतृत्वाखाली वैद्यनाथ आर्ट्स कॉमर्स अँडसायन्समहाविद्यालया मध्ये भारत सरकारच्या भारतीय प्रतिभूती व विनिमय बोर्ड (सेबी) व नॅशनल सेक्युरिटीज डिपॉझिटरी लिमिटेड (एन एस डी एल) अंतर्गत वैद्यनाथ महाविद्यालय परळी येथे ग्रॅज्युएशनच्या विद्यार्थ्यांसाठी एक दिवसीय स्मार्ट निवेशक जागरूकता कार्यक्रम घेण्यात आला.यासाठीच सेबी तसेच नॅशनल सेक्युरिटीज डिपॉझिटरी लिमिटेड (एनएसडीएल) चे सेक्युरिटीज मार्केटट्रेनर श्री.गणेश चौधरी सर यांनी विद्यार्थ्यांना आर्थिक नियोजनाचे मार्गदर्शन केले.अलीकडे तरुण वर्गां मध्ये आर्थिक साक्षरता व आर्थिक नियोजनाचा अभाव जाणून येतो. तरुणांचा कल दिवसेंदिवस चैनी वस्तू, मौजमजा,बर्थडे पार्टी अशा गोष्टींकडे होत चालला आहे तसेच फसवणूक करणाऱ्या योजना ज्यामध्ये कमी वेळेत अधिक परतावा देण्याचे अमिष दाखवून विद्यार्थ्यांची व सर्व सामान्यांची फसवणूक करताना आपणास पाहायला भेटत आहेत, यामुळे भविष्यातयेणाऱ्या शैक्षणिक तसेच आर्थिक अडचणींना त्यांना सामोरे जावे लागते म्हणून विद्यार्थी दशेमध्ये योग्य ती आर्थिक नियोजन त्यांनी केले तर भविष्यातील येणाऱ्या आर्थिक संकट ते निश्चितपणे टाळू शकतात व आर्थिक दृष्ट्या ते श्रीमंत आणि समृद्ध नागरिक बनू शकतात.या कार्यक्रमात त्यांनी विद्यार्थ्यांना बचत व गुंतवणूक याचे महत्त्व व फरक समजावून सांगितला,डिमॅट अकाउंट व त्याचे महत्त्व,कॅपिटल मार्केट काय असते? सेक्युरिटीज व म्युच्युअल फंड त्याचे वेगवेगळेप्रकार व फायदे,इत्यादी बद्दल सखोल मार्गदर्शन करून सेबीची वेब साईड व टोल फ्री नंबर देऊन भविष्यात फसव्या योजनांपासून सजग




राहण्याच्या सूचना दिल्या.हा कार्यक्रम यशस्वीरित्या पारपाडण्या साठी कॉलेजच्या प्राचार्य डॉ.सौ ए.आर.चव्हाण मॅडम,कॉमर्सच्याएचओडी सौ.गया मस्के मॅडम यांनी प्रयत्न केले,तसेच सूत्र संचालन व आभारप्रदर्शन प्राध्यापक सागर शिंदे सर यांनी केले,या कार्यक्रमा साठी डॉ.डी.के.आंधळे सर,डॉ.रेणुकादास समीर सर,डॉ.मीना मेहेत्रे मॅडम, डॉ.जिजाबाई कांगणे मॅडम,डॉ.गीते सर व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

हे पत्रक मालक,मुद्रक,प्रकाशक,संपादक वैभव विवेक स्वामी यांनी इंद्रधनुष्य प्रिंटिंग ॲण्ड पब्लिशर्स,सावता माळी चौक,मोंढा रोड,बीड,जिल्हा बीड येथे छापून दैनिक समर्थ राजयोग कार्यालय,छत्रपती कॉलनी,तहसील बॅक साईड,क्रांती नगर, बीड,जिल्हा बीड - ४३ ११ २२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER, EDITOR VAIBHAV VIVEK SWAMI AT ENDRADHANUSHYA PRINTING AND PUBLISHERS, SAVATA MALI CHOWK, MONDHA ROAD, BEED. DIST. BEED AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAINIK SAMARTH RAJYOG, CHATRAPATI COLONY, TAHASHIL BACK SIDE, KRANTI NAGAR, BEED, DIST. BEED-431122 ( MAHARSHTRA ).



# एम.टी.एस.परीक्षेत प्रीशा महेश रोकडे राज्यात द्वितीय

अंबाजोगाई/प्रतिनिधी

अंबाजोगाई येथील योगेश्वरी नूतन प्राथमिक विद्यालयाची वर्ग दुसरीची विद्यार्थिनी कु.प्रीशा महेश रोकडे ही एम.टी.एस. परीक्षेत राज्यात द्वितीय आलेली आहे.एम.टी.एस. परीक्षेत राज्यातून दुसरी आलेली प्रीशा महेश रोकडे हिने १५० पैकी १४६ गुण मिळवत राज्यातून दुसरा क्रमांक पटकावला आहे.कु.प्रीशा रोकडे ही महाराष्ट्र विद्यालय मोहा येथील आदर्श शिक्षक महेश रामहरी रोकडे यांची मुलगी आहे.तिला आई वर्षा रोकडे,वडील महेश रोकडे,आजोबा रामहरी रोकडे आणि योगेश्वरी नूतन विद्यालयातील शिक्षकांचे उत्तम असे मार्गदर्शन लाभले.कु. प्रीशा महेश रोकडे हिने मिळवलेल्या घवघवीत यशाबद्दल पुष्पगुच्छ देऊन आणि पेढा भरवून सत्कार करण्यात आला.याप्रसंगी सेवानिवृत्त पेशकार रामहरी रोकडे, संतोष रोकडे,महेशरोकडे, वर्षा रोकडे,मीना रोकडे, साधना रोकडे यांची उपस्थिती होती.

# सुकळी गावचे सुपुत्र बिबीशनराव गायकवाड यांच्याकडून प्रत्येक गावा तील दानशूर व्यक्तींनी प्रेरणा घ्यावी - मधुकरराव ठोंबरे

केज/प्रतिनिधी

शंभरात एक शूर निपजतो हजारात एक पंडित असतो दहा हजारात एक वक्ता मिळतो पण दानशूर व्यक्ती मिळणे खूपच कठीण आहे का बरे असे सुभाषितकार म्हणतात? दान एवढी कठीण क्रिया आहे? एवढी महती असून सुद्धा दानशूर व्यक्तीची समाजात वानवा असावी असे अनेकप्रश्न आंपणास पडतात परंतु याला अपवाद सुकळी तालुका केज जिल्हा बीड येथील रहिवासी व सध्या पुणे येथील प्रसिद्ध बांधकाम व्यवसायिक श्री.बिबीशन राव गायकवाड आहेत.


अतिशय कठीण स्थिती मध्ये बालपण घालवलेले शून्यातून विश्व निर्माण करणारे आज पुणे येथील नामवंत बांधकाम व्यावसायिक म्हणून ओळख असलेले श्री.बिबीशन गायकवाड हे दानशूर व्यक्ती म्हणून परिसरात ओळखले जातात.आपल्या गावा साठी आपण काही देणे लागतो याचे भान त्यांना सातत्याने असे शहरामध्ये जाऊन मोठे झाल्यानंतर गावाला विसरणारे हजारो लोक आपणास दिसतात, काही लोक मंदिराला, दवाखान्याला देणगी देतात.माझ्या गावातील गोरगरीब लोकांच्या मुलांना दर्जेदार शिक्षण मिळावे त्यांच्या शिक्षणा साठी सुसज्ज इमारत सर्व सोयीने युक्त असावी, युवकांनी मोठ्या पदावर जावे कल्पनेतून सुकळी

गावातील जिल्हा परिषद ची जुनी इमारत पाडून जवळपास स्वखर्चाने एक कोटी खर्च करून एक भव्यदिव्य,सुसज्ज,सर्व सोयींनी युक्त इमारत कंपाउंड सहित बांधून गावाला अर्पण केली. इमारतीची भव्यता शाळे मध्ये प्रवेश केल्यानंतर आपल्या लक्षात येते शाळेतील सुंदर रचना असलेले वृक्ष,शाळेच्या कंपाऊंड सहित वर्गाच्या बोलक्या भिंती,सुंदर वर्ग, खाजगी शाळेला लाजवेल अशी अतिशय सुंदर इमारत असल्याचे आपणास पहावयास मिळते.श्री.बिबीशनराव गायकवाड यांनी शिक्षणाचे मंदिर उभा करून दिले.माझ्यागावची मुले शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आले पाहिजेत, त्यासाठी मला प्रयत्नाची पराकाष्टा करावी लागली तरी मी करेल असे मत त्यांनी सातत्याने बोलून दाखवले.असे काम करणारा व्यक्ती पंचक्रोशी त असेल असे वाटत नाही

सदरीलशाळेला भेट देण्या साठी




दि.२४ मार्च २०२५ रोजी पुणे येथील सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रामध्ये काम करणाऱ्या महिलांचे शिष्टमंडळ आले होते.यामध्ये मनीषाताई गायकवाड,गीता नंदनवार सुजाता सूर्यवंशी,किशोरी पाटील,सपना सरनाईक यांचीप्रामुख्याने उपस्थिती होती,सर्व महिलांच्या शिष्ट मंडळाने बिबीशनराव गायकवाड यांचे कौतुक करून विद्यार्थी व शिक्षकांना मार्गदर्शन केले.यावेळी शाळेतील शिक्षक,विद्यार्थी हे प्रामुख्याने मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते. यावेळी माजी मुख्याध्यापक व श्री. बिबीशनराव गायकवाड यांचे सासरे श्री.मधुकर राव ठोंबरे यांनी सांगितले की,प्रत्येकाने आपल्या आयुष्यात कधीकधीअसा वेडेपणा करणे गरजेचे असते, पण हिम्मत काही जणांमध्येचअसते,अफाट संपत्ती असतानाहीपैशाचा मोह सुटत नाही.परंतु बिबीशनराव गायकवाड त्याला अपवाद असल्याचे मत श्री.मधुकरराव ठोंबरे यांनी व्यक्तकेले.शाळेतील शिक्षक आव्हाड सर व सर्वशिक्षकांनी पाहुण्यांचा सत्कार समारंभ केला व शेवटी आभार



# थकबाकी ३.४१ कोटी; परळीच्या पाणीपुरवठ्यावर संकटाचे सावट

## पाटबंधारे विभागाची नोटीस; मुदतीत नगरपालिकेने भरली नाही थकबाकी

परळी - नागरिकांकडून सक्तीने नळपट्टी वसूल करणाऱ्या परळी नगरपालिकेकडे माजलगाव पाटबंधारे विभागाची ३ कोटी ४१ लाख ७९ हजार ८२४ रुपयांची एकूण थकबाकी आहे. बुधवार, २५ मार्चपर्यंत ही थकबाकी भरण्याची अखेरची मुदत होती. परंतु, परळी पालिकेने थकबाकी भरली नसल्याने आता परळीचा पाणी पुरवठा कोणत्याही क्षणी बंद होण्याची शक्यता वाढली आहे.

परळी शहराला नागापूरच्या वाण प्रकल्पातून पाणी पुरवठा केला जात आहे. शहरासाठी वाढीव पुरवठा योजना कार्यान्वित झाल्यानंतर वाण प्रकल पातील ९ टक्के पाणी आरक्षित ठेवले जाते.

# दिल्ली येथे आरोग्य आणि कल्याण शिक्षण कार्यक्रमासाठी प्रमुख प्रवक्ते म्हणून प्रा.अभिलाष के.के.यांना नामांकन

कडा (प्रतिनिधी)

कडा येथील वर्धमान महावीर चॅरिटेबल ट्रस्ट संचलीत महावीर इंग्लिश स्कूल या सी. बी. एस. ई बोर्ड मान्यताप्राप्त शाळेचे प्राचार्य श्री. अभिलाष के. के.यांना युनेस्कोच्या आरोग्य आणि कल्याणाच्या शिक्षण कार्यक्रमासाठी प्रमुख वक्ते म्हणून नामांकित करण्यात आलेले आहे. हा कार्यक्रम २१जुलै ते २५ जुलै २०२५पर्यंत सी.आय.ई.टी.विभाग, एन.सी.ई आर. टी.नवी दिल्ली येथे युनेस्को एन.सी. इ. आर. टी.आणि सी.बी.एस.ई. बोर्ड यांच्यामार्फत आयोजित केला जाणार आहे. या कार्यक्रमामध्ये युनेस्को, पॅरिसच्या प्रतिनिधी सोबत भारताचे शिक्षण



जगातील विकसित राष्ट्राच्या बरोबरीने करण्यासाठी, शाश्वत विकास ध्येय साध्य करण्यासाठी भारत देशाने काय उपाययोजना केल्या आहेत हे स्पष्ट करतील.वेगवेगळ्या ५० प्रतिनिधीपैकी १० प्रतिनिधी सी.बी.एस.ई.बोर्डचे असतील त्यामध्ये महावीर इंग्लिश स्कूल चे प्राचार्य अभिलाष के.के. हे सी.बी.एस. ई.सी.ओ.ई. पुणे यांचे प्रतिनिधित्व करणार आहेत. त्यांच्या या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष- श्री.अमितजी राठोड, उपाध्यक्ष - श्री.संदिपजी चानोदिया , सचिव- श्री.हेमंतजी मेहेर, कोषाध्यक्ष - डॉ. प्रमोदजी भळगट, तसेच संस्थेचे इतर पदाधिकारी श्री.मनिषजी गांधी, श्री. प्रकाशजी श्रीश्रीमाळ, श्री.अमोलजी पटवा, श्री. संजयजी पितळे, श्री संतोषजी गांधी,सल्लागार श्री मेहेर सर आणि सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीस सरांना शुभेच्छा दिल्या.

# महामानव महिला नागरी पतसंस्थेच्या निवडी बिनविरोध

## महामानव महिला नागरी पतसंस्थेच्या अध्यक्षपदी कौशल्या भोले, उपाध्यक्षपदी रेश्मा आठवले, तर सचिवपदी कावेरा इनकर यांची बिनविरोध निवड

बीड (प्रतिनिधी)

बीड येथील महामानव महिला नागरी सहकारी पतसंस्थेची संचालक मंडळाची निवडणूक (२०२५-२०३०) बिनविरोध संपन्न झाली. संचालकानी नुतन पदाधिकारीची निवड बिनविरोध केली. अध्यक्षपदी कौशल्य गुलाबराव भोले, उपाध्यक्षपदी रेश्मा राजाभाऊ आठवले तर सचिवपदी कावेरा गौतम इनकर यांची निवड करण्यात आली. पतसंस्थेच्या नवनिर्वाचित संचालक मंडळाची बैठक पिठासीन अधिकारी पी.एस. रोडे यांच्या उपस्थितीत दि. २०/०३/२०२५ रोजी संपन्न झाली. सर्व संचालकांनी अध्यक्ष उपाध्यक्ष व सचिव पदाची निवडणूक बिनविरोध करण्याचे जाहीर केले. सदर बैठकीस नवनिर्वाचित संचालिका नंदाबाई दळवी,विजया जौजांळ, विद्या डोळस,वंदना वाघमारे व प्रभारी व्यवस्थापक पूजा जोंजाळ उपस्थित होत्या. महामानव अभिवादन ग्रुप , पतसंस्थेचे ज्येष्ठ सभासद डी.जी.वानखेडे, जी.एम.भोले, ए.बी. जौजांळ, डी.एम.राऊत, एस.एस.सोनवणे, के.एस.वाघमारे, प्रा.अशोक गायकवाड, सुजाता वासनीक, प्रशांत वासनिक, यांनी नवनिर्वाचित पदाधिकारी व संचालीका यांचा सत्कार केला. व पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या.

# डॉ. अशोक थोरात शैल्य चिकित्सक यांचे निलंबन तात्काळ रद्द करा नसता आम आदमी पार्टी आंदोलन करणार

माजी सैनिक अशोक येडे जिल्हाध्यक्ष आम आदमी पार्टी

बीड - आम आदमी पार्टीच्या वतीने मा. देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांना निवेदन देण्यात आले आहे की दिनांक २५ मार्च २०२५ रोजी अधिवेशनात मा. आमदार मुंदडा यांनी लक्षवेधी मांडली त्यावर आरोग्य मंत्री यांनी कसलाही विचार न करता तडका फडके राजकीय दबाव तंत्रा पोटी डॉ. अशोक थोरात शैल्य चिकित्सक बीड. यांचे निलंबन करण्यात आले या विषयावर विभागीय चौकशी चालू असताना त्या चौकशीच्या घेऱ्यामध्ये बारा अधिकारी असताना एकावरच कारवाई का? असा प्रश्न देखील उद्भवत आहे डॉ. अशोक थोरात यांचे कोविड काळातील आरोग्यसेवा ही चांगल्या प्रकारे व उत्कृष्ट दर्जाची देण्याचे काम बीड जिल्ह्यामध्ये करण्यात आले होते त्या सेवेचा देखील विचार केला गेला पाहिजे पण तोही केला गेला नाही त्या काळामध्ये नागरिकांना जीव वाचवणे हे सर्वात पहिले उद्दिष्ट होते ते कार्य २४ तास संपर्कात राहून जनतेला सेवा देण्याचे काम या आरोग्य अधिकाऱ्याने केलं जर काही चुकीचे घडले असेल तर नक्कीच कारवाई झाली पाहिजे परंतु यामध्ये संपूर्ण चौकशी न होता सर्वांची चौकशी करून त्यामध्ये लिप्त असणारे अधिकारी कर्मचारी व त्या काळातील पालकमंत्री यांच्यावर देखील कारवाई झाली पाहिजे फक्त एकाचाच राजकीय बळी चांगल्या अधिकाऱ्याचा चढू नये यामुळे हे निलंबन रद्द अशा कारवाईमुळे बीड जिल्ह्यामध्ये चांगले



अधिकारी एक तर येतच नाहीत आले तर त्यांना टिकू दिले जात नाही हे निलंबन रद्द करून तात्काळ त्यांना सेवेत रुजू करावे अशी आम आदमी पार्टी च्या वतीने माननीय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस महाराष्ट्र राज्य माननीय उपमुख्यमंत्री अजित दादा पवार पालकमंत्री बीड माननीय आरोग्य मंत्री यांना निवेदनाद्वारे व जनसामान्यांची भावना आहे या भावनेला लक्षात घेऊन आपण यावर योग्य चौकशी करून कारवाई करावी अन्यथा येणाऱ्या काळामध्ये आम आदमी पार्टी व बीड जिल्ह्यातील सर्व नागरिकांना सोबत घेऊन रस्त्यावर उतरल्याशिवाय राहणार नाहीत याची सर्व जवाबदारी ही आपल्या प्रशासनाची असेल असे निवेदन देण्यात आले यावेळी

माजी सैनिक अशोक येडे, जिल्हाध्यक्ष, सय्यद सादेक, शहर अध्यक्ष आजम खान तालुका उपाध्यक्ष, रफिक पठाण अल्पसंख्याक जिल्हाप्रमुख, कैलास चंदपालीवाल जिल्हा कोषाध्यक्ष, इत्यादी कार्यकर्ते उपस्थित होते

# मोटार सायकल चोरी करणाऱ्या दोन चोरांना माजलगाव शहर पोलिसांनी केले जेरबंद

## पाच मोटारसायकल केल्या जप्त

**माजलगाव (प्रतिनिधी)**

**माजलगाव शहर पोलिसांनी बुधवारी मोटारसायकल चोरी करणाऱ्या दोघां जणांना जेरबंद केले असून त्यांच्याकडून चोरीच्या पाच मोटारसायकल हस्तगत करण्यात आल्या आहेत या बाबत अधिक माहिती अशी की माजलगाव तालुक्यातील मोगरा येथील अविनाश मधुकर घनघाव यांची मोटारसायकल दि.२७ फेब्रुवारी रोजी दुपारी ४ वा.दरम्याण पुर्णवादी बँक च्या समोरुन चोरी गेली होती या बाबत त्यांचे फिर्यादीवरून माजलगाव शहर पोलिसात गुन्हा झाला होता**

या प्रकरणी पोलीस निरीक्षक राहुल सूर्य तळ यांनी तपास चक्र फिरवुन आरोपींचा शोध सुरू केला होता चार दिवसा पुर्वी त्यांच्या हाती धागे लागल्याने त्यांनी जय महेश साखर कारखाना परिसरात शोध घेतला असता तेथुन सचिन सुरेश बौत वय २२ वर्षे व्यवसाय मंजुरी रविंद्र सुरेश बौत वय २६ वर्षे व्यवसाय मंजुरी दोघे रा. साई मंदिर रोड पाथरी ता पाथरी जि परभणी ह.मु.जय महेश साखर कारखाना पवारवाडी यांना ताब्यात घेऊन उलट तपासणी केली असता घनघाव यांची मोटारसायकल चोरल्याची कबुली देत पुर्णवादी बँक माजलगाव येथुन चोरी केलेल्याची ०३ मोटारसायकल व इतर ठिकाणावरून चोरीस गेलेल्या ०२ मोटारसायकल चोरल्याची कबुली दिली पोलिसांनी एकुण ०५ मोटारसायकल किंमत २,३०,०००/ रुपयांची मुद्देमाल हस्तगत केला आहे व अधिक तपास चालू आहे सदरची कारवाई नवनीत कावत पोलीस अधीक्षक बीड श्रीमती चेतना तिडके अप्पर पोलीस अधीक्षक अंबाजोगाई चोरमले उपविभागीय पोलिस अधिकारी उपविभाग अंबाजोगाई यांचे मार्गदर्शनाखाली राहुल सूर्य तळ पोलिस निरीक्षक पोलिस ठाणे माजलगाव शहर पोलीस उपनिरीक्षक केरबा माकणे.पोहवा,/१५०८ अनिल भालेराव पोहवा/१२ गणेश तळेकर पोशि/२२९९ संतराम थापडे यांनी केली आहे



# धनंजय मुंडेंना सहआरोपी करणार का?

## जे कायद्यात होतं ते केलेलं आहे-मुख्यमंत्री

**सीआयडीने बीडच्या सरपंच संतोष देशमुख यांच्या निर्घृण हत्येचे आरोपपत्र दाखल केले आहे. आरोपपत्रात हत्येचे व्हिडिओ आणि फोटो पुरावे समाविष्ट आहेत. या प्रकरणात धनंजय मुंडे यांनी मंत्रिपद सोडले आहे.**

**बीडच्या मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या निर्घृण हत्याप्रकरणी सीआयडीने आरोपपत्र दाखल केले आहे. या आरोपपत्रातून अनेक धक्कादायक खुलासे करण्यात आले आहेत. संतोष देशमुख यांची हत्या करताना, त्यांना क्रूरपणे मारहाण करतानाचे अनेक व्हिडीओ, फोटो समोर आले.**

यानंतर संपूर्ण महाराष्ट्रात संतापाची लाट पसरली. या हत्येच्या कटात सहभागी असलेले विष्णू चाटे, सुदर्शन घुले, प्रतीक घुले, सुधीर सांगळे, महेश केदार, जयराम चाटे, कृष्णा आंधळे हे सर्वजण या फोटोत पाहायला मिळत आहे. संतोष देशमुखांची निर्घृण हत्या करतानाचे व्हिडिओ समोर आल्यानतंर धनंजय मुंडे यांनी त्यांच्या मंत्रिपदाचा राजीनामा दिला. धनंजय मुंडे यांनी राजीनामा दिल्यानंतर त्यांना सहआरोपी करा, अशी मागणी सातत्याने केली जात आहे. आता याप्रकरणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रतिक्रिया दिली.

विधानसभेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाची आज सांगता झाली. यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पत्रकार परिषद घेतली. या पत्रकार परिषदेत त्यांनी अधिवेशनात झालेल्या विविध घडामोडींवर भाष्य केले. यावेळी त्यांनी धनंजय मुंडेंच्या प्रकरणावरही भाष्य केले.

दोन्ही सभागृहांनी मिळून १२ कायदे मंजूर केले आहेत. माथाडी कायद्यात सकारात्मक सुधारणा केली आहे. माथाडींवर अन्याय होणार नाही, मात्र फेक माथाडी आणि ब्लॅकमेलिंग बंद होईल. खासगी सुरक्षा रक्षक बिल, विनियोजन विधेयक देखील पास केलं आहे. अर्थमंत्र्यांचे अभिनंदन करतो त्यांनी ५ सूत्रांवर



आधारित अर्थसंकल्प मांडला. महिला दिनी विशेष चर्चा झाली आणि वेगवेगळ्या चर्चेच्या माध्यमातून राज्यसमोरील प्रश्नांवर सकारात्मक उत्तर देण्याचा प्रयत्न केला. कुठेही पळ काढला नाही आणि सकारात्मक चर्चा केल्या. मंत्र्यांनी देखील चांगले काम केलं. अनेकदा सभागृह ९.४५ ला सुरु व्हायचे. मंत्र्यांनी योग्य अशी उत्तरं दिली. विरोधी पक्षाला आम्ही वाव दिला त्यांना उत्तरं दिली, असे देवेंद्र फडणवीस म्हणाले.

### जे कायद्यात होतं ते केलेलं आहे

लक्ष्यवेधी मांडल्या तर हरकत नाही. निकषात बसणाऱ्या लक्ष्यवेधीच आल्या पाहिजे बाकी नाही. विनापुरावे बोलणं बरोबर नाही. उलटसुलट काम व्हावे असं वाटत नसेल तर निकषानुसारच व्हाव्यात. कायदे विनाचर्चेनं पास झाले नाही, चर्चा झाल्या. अर्थसंकल्प अधिवेशनात खातेनिहाय चर्चा होत असते. धनंजय मुंडे प्रकरणी मी फार स्पष्ट शब्दात सांगितलेले आहे की याबद्दल नाराज असण्याचे काहीही कारण नाही. आम्ही कायद्याने चालतो. जे कायद्यात असतं ते करतो. जे कायद्यात होतं ते केलेलं आहे, असे देवेंद्र फडणवीस म्हणाले.

### त्यांच्या डोक्यात फक्त कबर आणि कामरा दिसतो

विकासासाठी अनेक धोरणं असलेला अर्थसंकल्प पारीत केल्याने विकासाला गती मिळेल. अधिवेशनाच्या निमित्ताने सर्व आमदार, पीठासीन अधिकारी कर्मचाऱ्यांचे आणि माध्यमांचे आभार मानतो. आपली प्रथा परंपरा आहे भाषण चांगलं झालं की चिठ्ठी पाठवायची. तुम्ही चुकीच्या ठिकाणी प्रश्न विचारत आहे. अध्यक्षांवर आमचा काही दबाव नाही. तुम्ही त्यांना हा प्रश्न विचारा. रोज ६ तास काम करायला पाहिजे मात्र आम्ही ९ तास काम केलं. त्यांच्या डोक्यात फक्त कबर आणि कामरा दिसतो त्याला आम्ही काय करणार, असा टोला फडणवीसांनी लगावला.

# पहिली महिला पत्रकार प्रिया पवळ यांचा अंभोरा पोलीस ठाण्यामार्फत सत्कार करुन कौतुकाची थाप..!

## अंभोरा पोलीस ठाण्यात मनुष्यबळ कमी असल्याचे मांडले गऱ्हाणे

आष्टी/प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील सुलेमान देवळा येथील प्रिया सोन्याबापू पवळ ही मुलगी नवोदित पत्रकार व आष्टी तालुक्यातील पहिली महिला पत्रकार म्हणून सन्मानित तिच्या निवडीबद्दल सर्वत्र पंचक्रोशीतुन कौतुकाची थाप होऊन सत्कार समारंभ होत असताना काल दि.२५ रोजी अंभोरा पोलीस ठाणे अंतर्गत पोलिस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक मंगेश साळवे साहेब यांनी नवोदित पत्रकार प्रिया पवळ यांचा सत्कार केला पुढील पत्रकारिता साठी शुभेच्छा देऊन चोरी दरोडा व गुन्हेगारी प्रवृत्तीच्या लोकांना आळा बसविण्यासाठी प्रत्येक जन सतर्क असायला हवा म्हणजे आपल्या राहत्या घरी व्यावसायिक ठिकाणी

प्रत्येकाने सीसीटीव्ही कॅमेरे बसून स्वत:ची सुरक्षितता व पोलीस कर्मचाऱ्यांना सहकार्य केले तर भविष्यात होणारी हानी टळली जाईल असे पोलीस स्टेशनचे सपोनि मंगेश साळवे साहेब यांनी नवोदित पहिली महिला पत्रकार प्रिया पवळ यांचा सत्कार करताना सांगितले व त्याचबरोबर अंभोरा पोलीस ठाणे हे बीड जिल्ह्यातील सर्वात मोठे रजाकाराच्या काळातले पोलीस स्टेशन असून या पोलीस स्टेशन अंतर्गत सर्वाधिक गावे समाविष्ट आहेत त्याकरिता या पोलीस स्टेशनमध्ये म्हणावे असे मनुष्यबळ नसल्याकारणाने हवे तिथे व हक्काच्या अंतरावर पोलीस कर्मचारी जाऊ शकत नाही त्याकरिता मी स्वत: लवकरच पोलीस अधीक्षक नवनीत काँवत साहेब यांना निवेदन देऊन पुरेसे मनुष्यबळ द्यावे अशी विनंती करणार आहे असे पोलीस अधीक्षक मंगेश साळवे यांनी सांगितले या प्रसंगी कर्तव्यदक्ष पो. कॉ.शिवदास केदार,समाजसेवक शौकत पठाण, दैनिक पुढारीचे पत्रकार प्रेम पवळ व नवोदित सत्कारमूर्ती पत्रकार प्रिया पवळ सह अंभोरा पोलीस उपस्थित होते.

पुरेसे मनुष्यबळ मिळण्यासाठी आम्ही पाठ पुरवा करु परंतु वाढत्या चोरी दरोडा या करिता आपण सतर्क राहून रात्री पेट्रोलियम करावे .- समाजसेवक शौकत पठाण



# ज्ञानदीप विद्यालयात स्वयंशासन दिन उत्साहात संपन्न

**मुख्याध्यापक विश्वजीत पवार तर उपमुख्याध्यापक सोहम बांगर यांनी सांभाळली दिवसभर शाळेची जवाबदारी**

किल्ले धारूर / अविनाश जगताप

किल्ले धारूर तालुक्यातील ज्ञानदीप विद्यालयामध्ये आज स्वयंशासन दिन उत्साहात साजरा करण्यात आला. या दिनानिमित्त इ.सातवी वर्गातील विद्यार्थ्यांनी सकाळी परिपाठापासून ते शाळा



सुटेपर्यंतचे मुख्याध्यापक, शिक्षक ते सेवक पर्यंतच्या सर्व जबाबदाऱ्या पार पाडत सर्व नियोजन केले.सकाळी आल्यानंतर सर्व विद्यार्थ्यांनी दररोज प्रमाणे शालेय परिपाठाचे सादरीकरण केले तसेच सर्व विषयाच्या वर्गानुसार तासिका घेतल्या. या स्वयंशासन दिनाच

मुख्याद्यापक म्हणून कु.विश्वजीत माणिक पवार तर उपमुख्याध्यापक चि. सोहम रमेश बांगर तसेच सेवक व इतर विद्यार्थ्यांनी शिक्षकाच्या जबाबदाऱ्या पार पाडल्या हा स्वयंशासन दिन यशस्वी होण्यासाठी विद्यालयातील शिक्षक श्री.रामराजा दराडे सर व अशोक अंडील सर व सरिता भोसले मॅडम यांनी नियोजन केले तर सौ. शैला महाजन मॅडम यांनी स्वयंशासन दिनानिमित्त सातवी वर्गातील सर्व विद्यार्थ्यांना शालेय उपयुक्त असे विविध पुस्तके दिली.सर्व शिक्षकांच्या सहकार्यातून आजचा स्वयंशासन दिन उत्साही व आनंदी वातावरणात संपन्न झाला.

# तालमार्तंड प्रकाश बोरगावकर यांचा रक्तदानात विक्रम

अंबाजोगाई (प्रतिनिधी)

संगीत आणि सामाजिक क्षेत्रामध्ये कार्यरत असणारे तालमार्तंड प्रकाश बोरगावकर यांनी गेल्या वीस वर्षांपासून आपण समाजाचे देणे लागतो ही भावना अंगीकारून रक्तदान हेच सर्वश्रेष्ठ दान समजून रक्तदानाला सुरुवात केली आहे.स्वारातीमध्ये उपचार सुरु असलेल्या नागेश औताडे यांना अचानक रक्ताची गरज पडली .अंबाजोगाई शहरातील सोशल मिडीया ग्रुपवर रक्ताची गरज असल्याची पोस्ट केली होती. ती पोस्ट पाहून स्वामी रामानंद तीर्थ रुग्णालयामध्ये तात्काळ जाऊन ७१ वे रक्तदान करून तालमार्तंड प्रकाश बोरगावकर यांनी नवीन विक्रम स्थापित केला आहे. बनारस घराण्याचे तबला वादक म्हणून ख्याती असणाऱ्या ताल मार्तंड प्रकाश बोरगावकर यांनी कोरोना सारख्या भयंकर परिस्थितीत सतत रुग्णांच्या मदती साठी सदैव पुढाकार घेत होते एवढेच नाही तर संपूर्ण महाराष्ट्रात कौतुकास्पद



ठरलेला मोकाट जनावरासाठी राबविलेला एक घास तुमचा हा स्तुत्य उपक्रम अत्यंत नियोजनबध्द पद्धतीने राबवून मोकाट जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न त्यांनी दुर्गानगर वासियांच्या मदतीने सोडवला होता.७१ वे रक्तदान संपन्न झाल्या बद्दल सर्वत्र त्यांचे अभिनंदन होत आहे.

# कळंब अंबाजोगाई रोडवर दोन तास रास्ता रोको

## शासनाने अनु-जाती आश्रम शाळांना शंभर टक्के वेतन शंभर टक्के अनुदान द्यावे - लव्हू बनसोडे

केज/प्रतिनिधी

राज्यातील शाहू, फुले, आंबेडकर अनु.जातीच्या आश्रम शाळांना विशेष बाब म्हणून अधिवेशनात शंभर टक्के अनुदान, शंभर टक्के वेतन श्रेणी शासनाने तात्काळ द्यावी या मागणी साठी अंबाजोगाई कळंब रोड, धनेगाव फाटा, पाथरा येथे दोन तास रास्ता रोको करण्यात आला.शासनाने राज्यातील २००२ मध्ये वर्तमान पत्राद्वारे अनु.जाती निवासी आश्रम प्रस्ताव मागवून शाळा चालू करण्यास सांगीतले तेव्हा पासून शाळा व कर्मचाऱ्यांना एकही रुपया दिलेला नाही त्यामुळे पुढील मागण्या साठी आज दोन तास रास्ता रोको करण्यात आला.मा. न्यायालय खंडपीठ नागपूर यांचा निर्णय दि,२८ ' २ / २००३,रि. पी. क्र.९५६ / २००३ मध्ये मा. उच्च न्यायालय यांनी दिलेला २८८आश्रम शाळांना तपासणीस आधीन राहून १६५ आश्रम शाळांना तात्काळ १०० टक्के अनुदान द्यावे.२ )राज्यातील १६५ आश्रम शाळेतील कर्मचार्यांना मान्यता मिळाल्यापासून, तपासणीस अनुदाना स पात्र ठरलेल्या १६ ५ शाळेतील कर्मचार्यां ना विशेष बाब म्हणून अधिवेशनात १०० टक्के वेतनश्रेणी द्यावी. तसेच आज पर्यंत संस्था चालक, कर्मचारी यांनी कसलाच एक रुपयाही पगार किंवा अनुदान न दिल्याने आत्महत्या वाढण्याची शक्यता नाकारता येत नाही त्यामुळे शासनाने आजपर्यंत फक्त तपासण्याच केल्या आहेत तरी आतातरी एक रुपयाही अनुदान व वेतन न दिल्याने सर्वस्वी जबाबदारी स्विकारून तात्काळ १६५ आश्रम शाळांना १०० टक्के अनुदान व १०० टक्के वेतन श्रेणी द्यावी या व इतर मागण्या साठी आज अंबाजोगाई कळंब रोड धनेगाव फाटा, पाथरा येथे दोन तास रास्ता रोको आंदोलन केले या वेळी सर्व कर्मचारी तसेच संस्था चालक उपस्थित होते या मागण्याचे निवेदन मा. राष्ट्रपती साहेब, मा. प्रधान मंत्री कार्यालय, मा. राज्यपाल



साहेब, मा. पोलिस महासंचालक, महाराष्ट्र, मुंबई, सामाजिक न्याय मंत्री साहेब, अनु.जाती आयोग मुंबई सह अनेक ठिकाणी दिले असून यावेळी युसुफ वडगाव पोलिस स्टेशन चे बसवेश्वर चनशेट्टी यांनी निवेदन स्विकारले तसेच यावेळी युसुफ वडगाव पोलीस स्टेशनचे कर्मचारी जी एम राऊत, योगेश समुद्रे, सय्यद अमजद, केदार, थोरात, आदि उपस्थित होते तसे अनु.जाती आश्रम शाळा संघर्ष समितीचे अध्यक्ष लव्हू बनसोडे, सागर बनसोडे, धनंजय बनसोडे, आशा राऊत, अनिता बनसोडे, पौळ व इतर कर्मचारी, उपस्थित होते.

# महाराष्ट्रातील शाहू फुले आंबेडकर अनुसूचित जाती निवासी आश्रम शाळा शिक्षक कर्मचाऱ्यांचा उपोषणाचा तिसरा दिवस

बीड / प्रतिनिधी

जिल्हाधिकारी कार्यालय बीड च्या समोर शाहू-फुले-आंबेडकर निवासी आश्रम शाळा महाराष्ट्र राज्यातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपोषणास बसले आहेत. उपोषणाचा आज दुसरा दिवस असून उपोषणकर्ते हैराण झाले आहेत. उपोषण स्थळी राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष महेबूब भाई शेख ,शिवराज दादा बांगर , यांनी भेट दिली व नियोदन दिले . तसेच बीड येथे ॲड. उज्ज्वल निकम साहेब आले असता त्यांना निवेदन देण्यासाठी या आश्रम शाळेचे शिष्टमंडळ भेटले व निवेदन दिले. त्यांनीही मुख्यमंत्र्यांशी भेटुन आपला प्रश्न मार्गी लावतो असा शब्द दिला. परंतु बीड जिल्ह्यातील संविधानीक पदावर असणारे लोकप्रतिनिधी किंवा संबंधित खात्याचे अधिकारी हे कोणीही उपोषण स्थळी फिरकले नाहीत. उपोषणकर्ते





व सहकारी शिक्षक दुसऱ्या दिवशीही शेकडोच्या संख्येत उपस्थित होते. गेल्या १८ वर्षांपासून विनावेतन काम करणारे शिक्षक हतबल झाले आहेत. तसेच १५ मार्च या दिवशी धनंजय नागरगोजे सर यांनी गळफास घेऊन आत्महत्या केली. असल्यामुळे सर्व शिक्षक त्या दुःखातून सावरले नाहीत . प्रत्येक कर्मचाऱ्याला वाटते आपले काय होणार ? की आपल्याला धनंजय नागरगोजे सर सारखी आत्महत्या करुन मरावे लागणार या हतबलतेमधुन शिक्षक सावरला नाही. म्हणून आमरण उपोषणाचा मार्ग शिक्षकांनी निवडला आहे तरी मुख्यमंत्री, अर्थमंत्री व सामाजिक न्यायमंत्री यांना विनंती आहे की हा प्रश्न लवकरात लवकर मार्गी लावावा नाही तर आणखी दुसरा धनंजय नागरगोजे तयार होऊ नये अशा भावना उपोषण कर्त्यांनी व्यक्त केल्या आहेत.

# राष्ट्रनिर्माते चक्रवर्ती विश्वसम्राट महान अशोक यांच्या जन्मदिनी राष्ट्रीय सुट्टी जाहीर करा

## भीम आर्मी संरद नेते भिमपँथर मा.राजेश गवळी यांची मागणी

प्रतिनिधी । मुंबई

संपूर्ण जगाच्या सुमारे ३५ टक्के भूभागावर आपली महासत्ता गाजवणारे , संपूर्ण भारत , आताचा संपूर्ण पाकिस्तान , अफगाणिस्तान , बांगलादेश , श्रीलंका , नेपाळ ह्या देशांवर आपली एकहाती सत्ता राबवणारे , आपले महासाम्राज्य प्रस्थापित करणारे , जगातील एकमेव सर्वश्रेष्ठ शासक, महान प्रजाहितदक्ष धम्मशासक चक्रवर्ती सम्राट, राष्ट्रनिर्माते चक्रवर्ती विश्वसम्राट , उच्च मर्यादा पुरुषोत्तम अशोक द ग्रेट यांची जयंती चैत्र शुद्ध अशोकष्टमी रोजी असते आणि ही जयंती संपूर्ण विश्वात साजरी करण्यात येते.त्याप्रमाणे आपल्या भारतात देखील महान अशोकांचा जन्मोत्सव साजरा करता यावा म्हणून भारत सरकारने देशभरात राष्ट्रीय सुट्टी जाहीर करावी अशी मागणी भीम आर्मी संविधान रक्षक दलाचे महाराष्ट्र राज्य मुख्यप्रवक्ते भिमपँथर मा.राजेश गवळी





यांनी सामान्य प्रशासन विभागाला लिहिलेल्या पत्रात केली आहे.यंदा अशोकअष्टमी ०५ एप्रिल रोजी असून , सरकारने आपल्या ह्या महान चक्रवर्ती सम्राटाच्या सन्मानार्थ सरकारी सुट्टी जाहीर करून कृतज्ञता व्यक्त करावी असे गवळी म्हणतात.

महान प्रियदर्शी अशोक जी, जे त्या सर्व खोट्या मिथकांना उद्धस्त करून जगासमोर उदयास आले आणि त्या महान राज्यकर्त्याचा महान प्रेरणादायी इतिहास द्वेषाच्या गडद अंधारात मांडण्याचे षड्यंत्र आणि त्यांच्याबद्दल हजारो वर्षांपासून पसरवलेल्या अज्ञानाच्या आणि चुकीच्या कथांना जमीनदोस्त करत एक आदर्श महान धम्मशासक म्हणून प्रियदर्शी महान अशोकांची जगभरात ओळख आहे.अश्या ह्या महान चक्रवर्ती सम्राटाचा जन्मदिन संपूर्ण जगभरात ' धम्म शासन ' म्हणून साजरा करण्यात येतो.यंदा सम्राट अशोकांची २३२९ वी जयंती असून ह्या दिवशी सरकारी सुट्टी जाहीर करावी असे भिमपँथर मा.राजेश गवळी म्हणतात.

भिमपँथर मा. राजेश गवळी यांनी आमच्या प्रतिनिधीशी बोलताना सांगितले की , चैत्र शुक्ल अष्टमीला म्हणजे ५ एप्रिल रोजी साजऱ्या होणाऱ्या थोर अशोक सम्राटांच्या जयंतीनिमित्त केंद्र सरकारने शासकीय सुटी जाहीर करण्याबरोबरच देशभरातील सर्व कत्तलखाने बंद करावेत, अशी मागणी करतानाच राजेश गवळी यांनी भारतीय जनतेला नम्र आवाहन व नम्र विनंती केली आहे की, ज्या महान राज्यकर्त्याने अखंड भारतावर एक आदर्श राज्य केले त्या महान अशोकांचे चित्र शासकीय, निमसरकारी, महाविद्यालयीन शाळांमध्ये लावावे, अशी मागणी केली आहे.आमच्या प्रतिनिधीला अधिक माहिती देताना भिमपँथर मा.राजेश गवळी जी म्हणाले की, या जयंती निमित्त प्रत्येक लोकशाहीवादी व्यक्तीने महान अशोक सम्राटाचे एक एक छायाचित्र देऊन ते शासकीय, निमशासकीय कार्यालये, ग्रामपंचायत कार्यालये, शाळा, महाविद्यालये आणि बौद्ध विहारांमध्ये लावावे.